रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ४४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २० जुलै २०२५

किंमत ४ ₹

**अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे आहे**

अलिबाग नागाव हायवे टच, लक्झरीयस् प्रॉपर्टीज, १५.५ गुंठे! रेडी टू बिल्ड प्लॉट Suitable for फार्महाऊस/रिसॉर्ट/ हॉटेल/ स्विमिंग पूल! Fast Ownership Transferable, प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ, सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, फुल झाडांचा बगीचा, उत्तम कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल, CCTV.

**मालक : ९७६९१०८१७०**

# तलाठी परीक्षेत घोळ?

**अधिकाऱ्यांच्या जवळच्या उमेदवारांना जास्त गुण?**

**रायगड जिल्ह्यातील उमेदवारांमध्ये नाराजीचे सूर**

**जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार फेरतपासणीची मागणी**

| प्रमोद जाधव |

| अलिबाग |

तलाठी संवर्गासाठी विभागीय दुय्यम सेवा परीक्षा डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. मात्र, हा निकाल संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. विभागीय दुय्यम सेवा परीक्षेच्या तपासणीत सावळागोंधळ झाल्याचा आरोप काही उमेदवारांनी केला आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे सूर उमटले असून, पेपरची फेरतपासणी करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.



तलाठी म्हणून रूजू झाल्यावर वेतनवाढीसाठी दुय्यम सेवा परीक्षा देणे तलाठ्यांसाठी बंधनकारक असते. त्यानुसार तलाठी संवर्गासाठी दुय्यम सेवा विभागीय परीक्षा २६ व २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत घेण्यात आली. महसूल व वन विभागाच्या नियंत्रणाखालील रायगड जिल्ह्यातील तलाठी संवर्गासाठी महाराष्ट्र दुय्यम सेवा विभागीय

•> पान २ वर

> **दुय्यम सेवा परीक्षेतील पेपर तपासणी संशयास्पद आहे. २००, १८०, १७५ गुण मिळतील इतके प्रश्न सोडविले आहेत. तरीदेखील ३५ ते ८०, ९५ असे गुण मिळाले आहे. त्यामुळे या पेपर तपासणीबाबत संशय निर्माण झाला आहे. जिल्हाधिकारी यांनी ही तपासणी पुन्हा घ्यावी, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे.**
>
> **– परीक्षार्थी (नाव न सांगण्याच्या अटीवरून)**

> **दुय्यम सेवा परीक्षा देणारे कर्मचारी असतात. त्यामुळे कोणावर कोणत्याही प्रकाराचा रोष ठेवून गुण कमी केले जात नाही. तसेच कोण ओळखीचा, नातेवाईक आहे, म्हणून गुण वाढविले जात नाहीत. नुकत्याच झालेल्या या परीक्षेच्या पेपरची तपासणी करण्यात आली. यावेळी उत्तरे योग्य नसल्याने गुण देणे कठीण झाले होते. त्यामुळे या परीक्षेत काही उमेदवार अनुत्तीर्ण झाले आहेत.**
>
> **– रवींद्र शेळके,**
> **उपजिल्हाधिकारी,**
> **सामान्य प्रशासन**

## वेधक

## प्रकल्पग्रस्तांचा उपोषणाचा इशारा

| अलिबाग | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील करंजा गावातून करंजा-रेवस पूल बांधण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या पुलासाठी अडीच हजार ते सात हजार कोटी रुपये खर्च होणार आहे. या पुलाचे बांधकाम ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीला देण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, रोजगार मिळावा, पुलासाठी लागणारे सर्व कॉन्ट्रॅक्ट करंजा येथील आगरी प्रकल्पग्रस्तांना द्यावे. करंजा-रेवस पूल बाधित प्रकल्पग्रस्त ६० टक्के मच्छिमार आगरी आहेत. या पुलामुळे आगरी मच्छिमारांचा कायमचा रोजगार बुडणार आहे. त्यामुळे आगरी मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मात्र, ठेका देण्यापासून रोजगार, नोकऱ्या देणार नसल्याची भूमिका ॲफकॉन कंपनीने घेतली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त संतप्त झाले आहेत. याविरोधात आवाज उठविण्याचा इशारा त्यांनी कंपनी प्रशासनाला दिला आहे.

महाराष्ट्र रस्ते, विकास महामंडळाच्या देखरेखेखाली रेवस-करंजा पुलाचे काम होणार आहे. दरम्यान, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांवर कोणताही तोडगा न काढता पूलउभारणीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे या अन्यायाविरोधात लढा पुकारण्यात आला आहे. त्यामुळे येत्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला प्रकल्पग्रस्त जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## जेएनपीए बंदरात १३ कोटींचा सिगारेटचा साठा जप्त

| उरण | प्रतिनिधी |

जेएनपीए बंदरातून देशात बेकायदेशीर सिगारेटचा मारा करणाऱ्यांच्या मुसक्या महसूल गुप्तचर संचालनालयाने आवळल्या आहेत. तब्बल १३.१८ कोटी रुपयांच्या विदेशी सिगारेटचा साठा डीआरआयने उधळून लावत, एकाला थेट अटक ठोकली आहे. भारतात विक्रीस बंदी असलेली ही सिगारेट समुद्रमार्गे चोरट्या पद्धतीने देशात आणली जात होती. कस्टम ड्युटीला डोक्यावर घेऊन देशाच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्या टोळीच्या डावावर डीआरआयने थेट घाव घातला आहे.

डीआरआयच्या मुंबई युनिटला मिळालेल्या खासगी माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली. न्हावा-शेवा बंदरात आलेल्या एका कंटेनरमध्ये कोटेड कॅल्शियम कार्बोनेट असं खोटं भासवून चक्क १०१४

•> पान २ वर

## मतदान यंत्राच्या पडताळणीवर संशय?

**मतदान यंत्राच्या रिक्त स्मृतीची होणार पडताळणी**

| अलिबाग | प्रतिनिधी |

मागील २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान यंत्राच्या रिक्त स्मृतीची तपासणी व पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल निवडणूक विभागाने घेतली असून, येत्या २२ व २३ जुलैला पेणमधील जिल्हा मध्यवर्ती मतदान यंत्र अभिरक्षा गृहामध्ये होणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी दिली.



मतदान होऊन सहा महिने उलटून गेले आहेत. त्याची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक होते. त्यामुळे येत्या दोन दिवसात होणाऱ्या मतदान यंत्राच्या पडताळणी व तपासणीवर नागरिकांकडून शंका व्यक्त केली जात आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील चार मतदान केंद्रांतील मतदान यंत्रामधील रिक्त स्मृतीची पडताळणी व तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नोव्हेंबर २०२४ मध्ये करण्यात आली होती. या तक्रारीची दखल तातडीने घेतली जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु, मतमोजणीला सहा महिने होऊन गेले आहेत. या सहा महिन्यांमध्ये मतमोजणीची यंत्रे निवडणूक विभागाकडे असताना त्यांनी तक्रारीची

•> पान २ वर

## भाई जयंत पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार

**स्वातंत्र्यसैनिक गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार जाहीर**

| मनमाड | प्रतिनिधी |

शेतकरी, राजकीय, सहकार चळवळीतील योगदानाबद्दल भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे नेते, खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारे माजी आमदार कॉम्रेड माधवराव गायकवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'जीवनगौरव पुरस्कार २०२५' यंदा ज्येष्ठ साम्यवादी नेते, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार कॉ. गायकवाड बहुद्देशीय संस्थेच्यावतीने देण्यात येणार असून, त्याचे वितरण नोव्हेंबर महिन्यात अलिबाग येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.



भाई जयंत पाटील यांनी एन.डी. पाटील, ए.बी. बर्धन, गोविंद पानसरे यांच्यासह चळवळीतील नेत्यांबरोबर दीर्घकालीन कार्य केले आहे. त्यांनी संपूर्ण आयुष्य समाजपरिवर्तनासाठी वाहिले आहे. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ हा पुरस्कार देण्यात येणार ।अहे. या पुरस्काराची घोषणा संस्थेच्या अध्यक्षा ॲड. साधना गायकवाड व सचिव राजू देसले यांनी केली. यावेळी विश्वस्त भास्कर शिंदे, श्याम गरुड, व्ही. डी. धनवटे, सुभाष बेदमुथा, शबूशेट शिरसाठ, दत्तू तुपे, रिकब जैन, निखिल स्वर्गे, डॉ. रामदास भोंग, देविदास भोपळे, साहेबराव गंभीरे आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी आ. कॉ. माधवराव गायकवाड यांचे १२ नोव्हेंबर २०१८ रोजी वयाच्या ९४व्या वर्षी निधन झाले. कॉ. गायकवाड यांचे कार्य शेतकरी, स्वातंत्र्य चळवळीत, खंडकरी शेतकऱ्यांना प्रदीर्घ लढ्यातून जमीन मिळवून दिली आहे. सहकार क्षेत्रातही छत्रपती

•> पान २ वर






## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जुलै

१) श्री.दिनेशकुमार कन्हय्यालाल वर्मा, चेंढरे, अलिबाग, २०-७-१९४८

२) श्री.मोतीराम महादेव पोरे बंदरविभाग, अलिबाग २०-७-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मारहाण करणाऱ्या मुख्याध्यापकांची पाठराखण?

## ■ अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न झाल्याने पालकांकडून संताप ■ युवासेना, आदिवासी संघटनेची बोटचेपी भूमिका?

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पाथरज येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या ३२ विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडून मारहाण करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी आपल्या झालेल्या मारहाणीचे व्हिडिओ आदिवासी संघटना यांना पाठविल्यावर या घटनेचे गांभीर्य लक्षात आले. मात्र, विद्यार्थ्यांना क्षुल्लक कारणासाठी मारहाण करणाऱ्या मुख्याध्यापक अजित बनसोडे यांच्यावर आदिवासी विकास विभागाने कोणतेही कारवाई केलेली नाही. मात्र, त्यांना कारवाईपासून वाचविण्यासाठी युवासेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष आणि कर्जत तालुका आदिवासी संघटना सरसावली असल्याने मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय पातळीवर अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. कर्जत तालुक्याचा अर्धा भाग हा आदिवासीबहुल असल्याने पाच शासकीय आश्रमशाळा तालुक्यात असून, साधारण दोन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.त्यातील पाथरज येथे असलेल्या शासकीय आदिवासी माध्यामिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेमध्ये मुख्याध्यापक हे विद्यार्थ्यांच्या जीवावर उठले आहेत. स्वच्छतागृहात असलेला अग्निशमन पंप तोडल्याचे कारण पुढे करुन शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक अजित बनसोडे यांनी कोणतीही खातरजमा न करता ३० विद्यार्थ्यांना मारले.

पाथरज आश्रमशाळेतील विद्यार्थी स्वच्छतागृहात असलेले अग्निशमन पंप तोडल्याचा माहिती प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांच्या लक्षात आले. त्या ठिकाणी आणि शाळेतील प्रत्येक वर्गात तसेच किचन घर, कार्यालय आणि सर्व ठिकाणी शासनाच्यावतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. त्या कॅमेऱ्यात बघून प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांनी खातरजमा न करता बारावीमधील तब्बल ३० विद्यार्थ्यांना छडीने मारले. त्या छडीचे चट्टे विद्यार्थ्यांच्या अंगाखांद्यावर दिसून आल्यावर पालक वर्ग संतप्त झाला आहे.पालकांच्या तक्रारीनंतर आदिवासी सेवा संघटना आक्रमक झाली असून, आदिवासी कार्यकर्ते आश्रमशाळेत पोहोचले आणि त्यांनी जाब विचारला. प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे हे पालकांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

आदिवासी कार्यकर्ते जैतू यांनी या प्रकरणी आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या मारहाणप्रकरणी तक्रारी केल्या असून, त्यांनी पाथरज शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक अजित बनसोडे यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

त्यामुळे प्रकल्प अधिकारी कार्यालयाने प्रभारी मुख्याध्यापक अजित बनसोडे यांच्याकडून प्रकारांचा खुलासा मागितला. मात्र त्यावर आदिवासी विकास विभागाचे समाधान झाले आहे काय? की प्रभारी मुख्याध्यापक यांच्यावर प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून कारवाई होणार? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, त्यानंतर प्रकरण आदिवासी विकास विभागाच्या कक्षेत असताना कर्जत तालुक्याची आदिवासी समाज संघटना आक्रमक होण्याऐवजी मुख्याध्यापकांची पाठराखण करताना दिसत आहे. मारहाण झालेले बहुसंख्य विद्यार्थी हे आदिवासी समाजाचे आहेत, परंतु बाहेरच्या जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर येत असून, आदिवासी विद्यार्थ्याला वाऱ्यावर सोडण्याचा प्रयत्न आदिवासी संघटना करताना दिसत आहे.

त्यात शिवसेनेच्या युवासेनेचे जिल्हा अध्यक्ष प्रसाद थोरवे यांनी देखील या आश्रमशाळेत भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तेथे प्रसाद थोरवे यांनी मुख्याध्यापकांचे म्हणणे ऐकून घेतले; परंतु मुख्याध्यापक यांचा मार खाणाऱ्या ३० विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे आवश्यक वाटले नाही. त्यामुळे प्रभारी मुख्याध्यापक बनसोडे यांना राजकीय अभय दिले जाण्याची शक्यता आहे. मात्र, या मारहाणप्रकरणी मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई झाली पाहिजे यासाठी आदिवासी सेवा संस्थेचे अध्यक्ष जैतू पारधी आक्रमक आहेत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, असे बोलले जात आहे.

## रानभाज्यांच्या कवितांचा घेतला कवींनी आनंद

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणतर्फे दर महिन्याच्या १७ तारखेला मधुबन कट्टा विमला तलाव येथे कविसंमेलन संपन्न होत असते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिराचंद म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या मधुबन कट्ट्याच्या ११७ व्या कविसंमेलनात कवी मच्छिंद्र म्हात्रे, अजय शिवकर, हेमंत पाटील, बालकवी अनुज शिवकर, अनामिका राम, समता ठाकूर, तेजस्विनी गायकवाड, रायगड भूषण प्राध्यापक एल.बी पाटील, रामचंद्र म्हात्रे आदी कवींनी रानभाज्यांवर कविता सादर करून काव्य संमेलनाला एक वेगळीच रंगत आणली.



कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मच्छिंद्र म्हात्रे यांनी महाराष्ट्रातील रानभाज्यांचा आढावा व महत्त्व विशद केले, त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंढरपूर येथील साहित्यिक वारीचे अनुभव विशद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीव पाटील यांनी केले, तर या कविसंमेलनास ज्येष्ठ नागरिक सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, मारुती तांबे, अनिता शिवकर, मीना बिष्ट, रमेश माळी, रवींद्र सूर्यवंशी, महिंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

## ‘त्या’ महिलेचा मृतदेह सापडला

### ● कोलाडच्या रेस्क्यू टीमला यशस्वी

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्याजवळील चिकणी येथील आदिवासी वाडीतील ३५ वर्षीय महिला अलका लहू जाधव हिने बुधवारी (दि.१६) सकाळी ८.३० वाजता अंबा नदीत उडी घेतली होती. या महिलेची शोधमोहीम कोलाड येथील सह्याद्री वन जीव संरक्षण संस्थेच्या रेस्क्यू टीमकडून तसेच आपत्कालीन यंत्रणेच्या सहाय्याने सुरू करण्यात आली होती. त्यानुसार तीन दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी सायंकाळच्या सुमारास या आदिवासी महिलेचा मृतदेह जेएसडब्ल्यू कंपनीच्या परिसरात असलेल्या अंबा नदीच्या खाडीच्या पात्राच्या किनारी भागात सापडला आहे. या महिलेची ओळख पटविण्यात आली आहे. ही महिला सापडल्याने सदरची शोधमोहीम थांबविण्यात येत असल्याचे रेस्क्यू टीमकडून जाहीर करण्यात आले आहे. तसेच या शोधमोहिमेसाठी आपली बोट उपलब्ध करून दिल्याबद्दल रेस्क्यू टीमने नागोठणे ग्रामपंचायतीचे आभार मानले आहेत.

## निवृत्त रेल्वे कामगारांसाठी ‘उमीद’

**| कर्जत | प्रतिनिधी |**

निवृत्त रेल्वे कामगारांना आपल्या आरोग्यविषयक सेवा कोणत्याही चांगल्या दवाखान्यात घेण्यासाठी लागणाऱ्या उमीद कार्डचे शिबीर कर्जत रेल्वे स्थानकात आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ अनेक निवृत्त रेल्वे कामगारांनी घेतला.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

रेल्वे कामगार किंवा निवृत्त रेल्वे कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याण आणि भायखळा येथील रेल्वेच्या हॉस्पिटलमध्ये उपचार करून घ्यावे लागतात. मात्र, उमीद कार्ड असल्यास कोणत्याही चांगल्या दवाखान्यात घेता येतील. यासाठी उमीद कार्ड शिबिराचे आयोजन कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एक वर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी आत्माराम निघोजकर, सुनिल चव्हाण, गजानन गुरव, रामचंद्र कडू, बबन गायकवाड, चंद्रकांत ओंबळे, गणपत मुंढे, अशोक बॅनर्जी, बबन रुठे, मधुकर पवार, जयकृष्ण मलातपुरे आदी उपस्थित होते.

## वाळू, गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन

**| महाड | प्रतिनिधी |**

राज्यात विनापरवाना वाळू उत्खनन करणे, त्याचबरोबर गौण खनिजाचे अनधिकृत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी शासनाने नवीन परिपत्रक काढले आहे. यानुसार ही कारवाई केली जाईल, असे म्हटले आहे.



राज्यात अनधिकृत वाळू आणि गौण खनिज उत्खनन वाढले असतानाच या तस्करांकडून कारवाईला जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने आता नवीन परिपत्रक काढून अनधिकृत वाळू उत्खनन आणि गौण खनिज उत्खनन वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. यामुळे यापुढे वाळूबाबत

### ● वाहतूक वाळूतस्करांना भोवणार

अनधिकृत उद्योग करणाऱ्यांना वाळू तस्कर म्हणून संबोधले जाणार आहे. तसेच गौण खनिजाचे अवैध उत्खनन वापर वाहतूक व तस्करी करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यास अथवा दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपासात पोलीस व महसूल यंत्रणेमधील तसेच संबंधित सक्षम यंत्रणेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी हलगर्जीपणा अथवा कसुरी केल्यास ते निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात संबंधित जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक व पोलीस आयुक्त यांनी कारवाई करावी, असे स्पष्ट प्रतिज्ञापत्रात म्हटल्याचे वाळूतस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## माथेरानमध्ये चोरट्यांनी दुकान फोडले

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानमधील इंदिरा गांधी नगर येथील साईकृपा कोल्ड्रिंग्स व किराणा स्टोअरमध्ये शुक्रवारी रात्री चोरट्यांनी धाडसी चोरी केली. अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे टाळे व कड्या उचकटून दुकानात प्रवेश करत रोख रक्कम व सिगारेटच्या पाकिटांसह अंदाजे १५ ते २० हजार रुपयांचा माल लंपास केला. दुकानाचे मालक महेंद्र जाबरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी दुकानाच्या मागील बाजूने प्रवेश करून आणि मागचा दरवाजा, पुढील शटरचा भाग व आतील दरवाजे असे एकूण तीन दरवाजे तोडून दुकानात प्रवेश केला.




दरम्यान, कर्जत,नेरळ गावात असा प्रकार घडत असतानाच माथेरान परिसरातही चोरीच्या घटना सुरू झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. माथेरान पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी ए. एम. सोनाने व एपीआय गणेश गिरी हे या घटनेचा तपास करत आहेत. स्थानिक व्यापाऱ्यांनी या चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. त्यातच याठिकाणी सुट्ट्यांच्या हंगामात मोलमजुरी करण्यासाठी परिसरातून अनेक नवनवीन लोक येत असतात. त्यांचे ओळखपत्र पोलीस ठाण्यात असावे. जेणेकरून भविष्यात काही अन्य घटना घडल्यास चौकशी करणे शक्य होईल अशी मागणी सुध्दा जोर धरू लागली आहे.

## उपसरपंचपदी सुप्रिया कोळी

**उरण** : तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवसेना पक्षाच्या (उबाठा) सदस्या सुप्रिया कोळी यांची बिनविरोध निवड दि.१८ जुलै रोजी झाली. यावेळी सरपंच अजय म्हात्रे, माजी सरपंच मंगेश थळी, माजी उपसरपंच सोनाली ठाकूर, व्यंकटेश म्हात्रे, कल्पना पाटील, सदस्या मानसी पुरो, उज्ज्वला म्हात्रे, पुष्पा म्हात्रे, प्रमिला म्हात्रे, जागृती कोळी, ग्रामपंचायत अधिकारी सुधीर चव्हाण व कर्मचारी वृंद तसेच शिवसेनेचे उपविभाग प्रमुख राजू पाटील, नंदू चव्हाण, परेश थळी, गणेश पाटील इतर पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## तलाठी परीक्षेत घोळ?

परीक्षा नियम, १९९७ अन्वये जिल्हाधिकारी यांना परीक्षा प्रक्रिया पार पाडण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या देखरेखीखाली ही परीक्षा पार पडली. रायगड जिल्ह्यातील ३९ तलाठ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. एकूण २०० मार्कांची लेखी परीक्षा होती. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी शंभर गुण प्राप्त करणे आवश्यक होते. त्यानुसार तलाठी उमेदवारांनी आपल्या क्षमतेनुसार या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. एकूण ३९ उमेदवारांपैकी १४ उमेदवार उत्तीर्ण झाले. यामध्ये प्रथम संधीमध्ये दहा जण उत्तीर्ण झाले. सुट्टीचा फायदा घेऊन चार उमेदवार उत्तीर्ण झाले. तसेच २५ उमेदवार अनुत्तीर्ण झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

परंतु, अनुत्तीर्ण झालेल्या काही उमेदवारांनी या परीक्षेच्या पेपर तपासणीवर आक्षेप घेतला आहे. या तपासणीवर संशय निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. जे उमेदवार अधिकाऱ्यांच्या जवळचे आहेत, तसेच नातेवाईक आहेत, त्यांना या परीक्षेत जास्त गुण देऊन उत्तीर्ण केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे या परीक्षेत भ्रष्टाचार झाल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. दुय्यम सेवा परीक्षेतील तपासणीबाबत नाराजीचे सूर उमटले आहेत.

## भाई जयंत पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार

नाशिक जिल्ह्या नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. ३२ वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या पथसंस्थेच्या आठ शाखा कार्यरत आहेत. हौसिंग सोसायटी उभ्या केल्या आहेत. त्यातून अनेकांना घरे मिळाली आहेत. नांदगाव विधानसभेचे आमदार, सहा वर्षे विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते, मनमाड नगरपालिकेचे थेट नगराध्यक्ष, भाकप महाराष्ट्रचे १२ वर्षे राज्य सरचिटणीस, किसान सभेचे १५ वर्षे अध्यखपद भूषविले. आयटक संलग्न नगरपालिका कर्मचारी संघटना, रेल्वे युनियन, आदी चळवळीत ७५ वर्षे योगदान दिले आहे.

कॉम्रेड माधवराव गायकवाड(बाबूजी) यांचा विचाराचा वारसा व कार्य नेण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक कॉम्रेड माधवराव गायकवाड बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक शेती, सहकार चळवळ, कामगार क्षेत्र आदी संदर्भात उपक्रम राबविले जातात. आज कॉम्रेड माधवराव गायकवाड १८ जुलै जन्मदिनी २०२५ यावर्षी कॉम्रेड माधवराव गायकवाड सातव्या स्मृती दिनी जीवनगौरव पुरस्कारसाठी मा. आमदार जयंत पाटील (अलिबाग) निवड केली आहे. रोख रक्कम ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार वितरण नोव्हेंबर महिन्यात कर्मभूमीत अलिबाग येथे कॉ. माधवराव गायकवाड बाबूजी स्मृती दिनी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रधान करण्यात येणारं आहे. याआधी हा पुरस्कार खा. राजू शेट्टी, कॉ. एम ए पाटील, कॉ . अण्णासाहेब थोरात,कॉ. मोहन शर्मा, कॉ. तुकाराम भस्मे, कॉ. सूकुमार दामले , माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ भालचंद्र कांगो यांना देण्यात आला आहे. अशी माहिती नाशिक येथे संस्थेच्या अध्यक्षा ॲड. कॉम्रेड साधना गायकवाड, सचिव कॉ. राजू देसले यांनी दिली.

## मतदान यंत्राच्या पडताळणीवर संशय?

तातडीने दखल का घेतली नाही, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केला जात आहे. मतदान प्रक्रियेत मंगळवारी २२ जुलैला एक मतदान केंद्रावरील मतदान यंत्राच्या रिक्त स्मृतीची तपासणी होणार आहे. त्यानंतर बुधवारी (दि.२३) तीन मतदान केंद्रावरील यंत्राच्या रिक्त स्मृतीची तपासणी व पडताळणी करण्यात येणार आहे. यासाठी पेण तालुक्यातील शितोळे येथील रायगड जिल्हा मध्यवर्ती मतदान यंत्र अभिरक्षा गृह सकाळी नऊ वाजता उघडण्यात येणार आहे. सकाळी दहा ते सायंकाळी सात यावेळेत रिक्त स्मृतीची तपासणी व पडताळणी केली जाणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे यांनी दिली.

मतदान यंत्रातील रिक्त स्मृतीची पडताळणी करण्यावर शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील काही उमेदवार व नागरिक याबाबत उच्च न्यायालयात दाद मागणार आहे, अशी माहिती उपलब्ध होत आहे.

## जेएनपीए बंदरात १३ कोटींचा सिगारेटचा साठा जप्त

कार्टून परदेशी सिगारेट देशात घुसवण्याचा डाव होता. पण, डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी हा खेळ पुरता हाणून पाडत, कंटेनरमधून १ कोटी १ लाख ४० हजार सिगारेट जप्त केल्या. यावर कुठलाही वैधानिक इशारा नसल्याने या सिगारेट पूर्णपणे बेकायदेशीर ठरतात.

सध्या याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून, त्याच्यावर कस्टम कायदा १९६२ आणि सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम २००८ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. अटक केलेल्या आरोपीला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा तपास अधिक खोलात सुरू आहे. देशातल्या तरुण पिढीच्या आरोग्यावर झडप घालणाऱ्या या सिगारेट सिंडिकेटमागे आणखी कोण आहेत, हे उघडकीस आणण्यासाठी तपास यंत्रणांची खरी कसोटी आता सुरू झाली आहे.

## मोऱ्यांचे सुरक्षा कठडे अद्याप गायब

**| अलिबाग | वार्ताहर |**

तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्यावरील कुरुळ-बेलकडेदरम्यान असणाऱ्या मोऱ्यांचे संरक्षक कठडे मागील दोन-तीन वर्षांपासून गायब झालेले आहेत. याठिकाणी मोठमोठे अपघातही होत आहेत, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्या संबंधित प्रशासनाला याबाबत काहीच देणे-घेणे नसल्याचे दिसून येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधीच हा रस्ता आपल्याकडे नसल्याचे सांगत हात वर केले आहेत. त्यामुळे कठड्यांचे काम करायचे कोणी, असा प्रश्न नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.

## अंजुमन महाविद्यालयात फळ रोपांचे वाटप

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

संपूर्ण देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या आणि जगाला नवी दिशा देणारे गुणवंत, कीर्तीवंत विद्यार्थी घडवणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या १६९ व्या स्थापना दिनानिमित्त अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा येथे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला. दि. १८ जुलै रोजी याप्रसंगी महाविद्यालयात पंचक्रोशीतील गरजू व्यक्तींना फळ रोपांचे वाटप करण्यात आले.




या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजचे चेअरमन माननीय जैनुद्दीन कादरी यांनी भूषवले. पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात गरजू व्यक्तींना एकूण ५० फळझाडांची रोपे वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या आयोजनात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. रहीम बागवान, प्रा. जावेद खान, ग्रंथपाल अंजुम दाखवे यांनी विशेष सहकार्य केले. प्रा. स्वालेहा कारभारी यांनी सूत्रसंचालन केले.

## कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे जीव गुदमरतोय!

### विद्यार्थ्यांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**| अलिबाग | वार्ताहर |**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथील झुंझार मैदानाजवळील नवेनगर फाट्याच्या मार्गावर असह्य घाणीमुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या परिसरात उभारण्यात आलेले डंपिंग ग्राऊंड हे रा.जि.प. शाळेच्या अगदी शेजारी असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य सातत्याने बिघडत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांनी याबाबत वेळोवेळी तक्रारी करूनही स्थानिक प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे. चायनीज दुकानातील उरलेले पदार्थ, कोंबड्यांची पिसं, बाजारातील सडलेला भाजीपाला व घाण सगळं बेधडकपणे रस्त्यावर टाकलं जातं. यामुळे अर्धा रस्ता कचऱ्याने व्यापला असून, वाहतूक खोळंबते, अपघातही वाढले आहेत.

या दुर्गंधीयुक्त कचऱ्यावर भटके कुत्रे मोठ्या प्रमाणात जमा होऊ लागले असून, प्रवास करताना वाहनांच्या समोर कुत्रे धावत असल्यामुळे अनेक अपघात घडत आहेत. पावसात खड्डे पाण्याने भरून जात असल्याने ते नजरेसही न पडता वाहनचालक सरळ त्या खड्ड्यांत पडतात.



### तात्काळ उपाययोजना करा

या असह्य परिस्थितीपासून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून डंपिंग ग्राऊंड दुसऱ्या ठिकाणी हलवावे, नियमित साफसफाई व फवारणी करावी आणि रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी जोरदार मागणी रहिवाशांनी केली आहे.

# एसटीची स्मार्टकार्ड योजना बारगळली

## ठेकेदार कंपनीला परवडत नसल्याची चर्चा

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

एसटी महामंडळाने मोठा दिखावा करित कागदी ओळखपत्राच्या जागी प्रवाशांना स्मार्टकार्ड देण्याची योजना सूरू केली. परंतु, ही योजना बारगळी असून तयार केलेले असंख्य स्मार्टकार्ड जिल्ह्यातील एसटी बस आगारातील आरक्षण कक्षात धुळखात पडून आहेत. त्यामुळे स्मार्टकार्ड योजना बंद पडली असून आता जून्याच कागदी ओळखपत्राचा आधार घेत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तहसील कार्यालयातून मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दाखल्याच्या अधारे एसटीची सवलत मिळते. त्याचबरोबर शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एसटीची सवलत दिली जाते. तसेच, नियमीत प्रवास करणाऱ्या




प्रवाशांसह सात दिवस, चौदा दिवस कुठेही प्रवास योजनेसाठी देखील एसटीचे पास मिळतात. मात्र, सवलत पास हे कागदी स्वरूपात असल्यामुळे ते पावसाळ्यात भिजून खराब होण्याबरोबरच गहाळ होण्याची भिती निर्माण झाली होती. त्यामुळे नऊ वर्षांपूर्वी एसटी महामंडळाने स्मार्ट कार्ड योजना सूरू केली. त्यानंतर जिल्ह्यातील प्रत्येक स्थानकातील आरक्षण कक्षात स्मार्टकार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आली. एटीएम सारखे अद्ययावत असे स्मार्टकार्ड पास व ओळखपत्र म्हणून हाताळताना प्रवाशांनाही आनंद वाटत होता.

एसटीच्या स्मार्टकार्डच्या अधारे ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच, एसटीतून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अन्य पासधारक प्रवाशांनादेखील स्मार्टकार्ड देण्यास सुरुवात केली. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून स्मार्टकार्ड योजनाच बंद पडली आहे. ज्या कंपनीकडून स्मार्टकार्ड दिले जात होते, त्या कंपनीला परवडत नसल्याने त्यांनी हे काम थांबविल्याची चर्चा एसटी महामंडळात सुरू आहे. त्यामुळे एसटीची स्मार्टकार्ड योजना बारगळी असल्याचे दिसून येत आहे.

> **स्मार्टकार्ड योजना शासनाची आहे. गेल्या दोन वर्षांपासून ही योजना बंद झाली आहे. प्रवाशांसह विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी ज्येष्ठ नागरिकांना आधार कार्डद्वारे एसटीतून प्रवास करण्याची व्यवस्था केली आहे. सध्या जून्याच पद्धतीने कामकाज करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार कामकाज सुरू आहे. स्मार्टकार्ड का बंद आहेत, याची माहिती अद्याप वरिष्ठ पातळीवर मिळालेली नाही.**
>
> **–दिपक घोडे, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, रायगड विभाग**

### प्रवास पुन्हा कागदी पासच्या भरोसे

**२०१६ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरु झाली. एटीएम कार्डसारखे अद्ययावयत असे स्मार्टकार्ड विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व अन्य पासधारकांचे 'स्मार्ट' ओळखपत्र बनले. ते ओळखपत्र स्कॅन केल्यावर त्याची नोंदणी मशीनमध्ये केली जात होती. ज्या कंपनीला स्मार्टकार्ड तयार करण्याचे काम दिले होते, त्याच कंपनीने तांत्रिक बिघाड असल्याचे कारण पुढे केले आहे. सर्व्हरची समस्या निर्माण झाल्याने ज्येष्ठ नागरिकांना व विद्यार्थ्यांना नव्याने स्मार्टकार्ड काढण्यापासून मुदत संपलेल्या स्मार्टकार्डचे नुतनीकरणही करणे थांबल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एसटीतून प्रवास करताना प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ज्येष्ठ नागरिकांना आता आधार कार्डच्या व विद्यार्थ्यांना कागदी पासच्या भरोवश्यावरच प्रवास करावा लागत आहे.**

# पेणमधील दोन सावकारांना दणका

## जनतेची लूट करणे पडले महागात

| अलिबाग | प्रतिनिधी |

सावकारीचा गोरखधंदा चालविणाऱ्या पेण तालुक्यातील चिंचपाडा येथील दोन सावकारांना रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने दणका दिला आहे. जनतेची पिळवणूक करून त्यांची आर्थिक लूट करणे त्यांना महागात पडले आहे. या दोघांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून वचनचिठ्ठ्या, धनादेशासह इतर संशयास्पद कागदपत्रे ताब्यात घेण्यात आली आहेत.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुर्यकांत पाटील आणि भरत पाटील असे दोन सावकारांची नावे आहेत. या दोघांनी मिळून पेणमध्ये परवानाधारक सावकारीचा धंदा चालू केला होता. परंतु, त्यांच्याकडून आर्थिक लूट केली जात होती. त्यामुळे त्यांच्या या सावकारी जाचाला कंटाळलेल्या काही त्रस्त नागरिकांनी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची भेट घेतली. त्यांच्याकडे गाऱ्हाणे मांडून लेखी तक्रार दिली. या तक्रारीची गंभीर दखल घेत आंचल दलाल यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करण्यात आले. सहकार विभागातील अधिकाऱ्यांसह या पोलीस दलाने संयुक्त कारवाई करण्यास सुरूवात केली. त्यांनी एकाच वेळी त्यांच्या घरी, हॉटेलमध्ये व इतर ठिकाणी छापे टाकले. त्यावेळी कर्जदारांकडून लिहून घेतलेल्या वचन चिठ्ठ्या, धनादेश व मिळालेली इतर कागदपत्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

ही कारवाई यशस्वी करण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, प्रसन्ना जोशी, पोलीस हवालदार मोरेश्वर ओंबळे, महिला पोलीस हवालदार अस्मिता म्हात्रे, रेखा म्हात्रे, झुलिता भोईर, पोलीस हवालदार सचिन वावेकर, पोलीस शिपाई ईश्वर लांबोटे, बाबासो पिंगळे, अक्षय जगताप व ओमकांर सोंडकर यांनी मेहनत घेतली.

## पाझर तलावात बुडून मृत्यू

| रसायनी | वार्ताहर |

खालापूरमधील लोधिवली येथील पाझर तलावात मौजमजा करण्यासाठी दहा ते बारा मित्रांचा ग्रुप आला होता. तलावात पोहण्याचा मोह चेंबुर येथील सुनिल मोरे यांना आवरता न आल्याने ते पाण्यात पोहण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यु झाला. ही घटना शुक्रवारी (दि.१७) घडली आहे. सुनिल मोरे तलावात बुडाल्याची माहिती मिळताच पोलीस उपनिरिक्षक विशाल पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी हेल्प फाऊंडेशनने तलावात रेस्क्यु करत शव तलावाबाहेर काढले. चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पवार अधिक तपास करीत आहेत.

# मेहनत केली तर यश अटळ आहे

## सुयोग आंग्रे यांचे प्रतिपादन



| अलिबाग | प्रतिनिधी |

स्पर्धा परीक्षा क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवून मेहनत केली, तर यश अटळ आहे, असे प्रतिपादन कृषीवलचे सहयोगी संपादक सुयोग आंग्रे यांनी केले आहे. अलिबाग येथील स्पर्धा विश्व अकॅडमीत विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सुयोग आंग्रे यांनी आपल्या वक्तव्यातून स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, प्रश्नांची पद्धत, सध्याच्या घडामोडींचे महत्त्व, वर्तमानपत्राचे वाचन, नोट्स तयार करताना लक्षात ठेवायच्या गोष्टी यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतः च्या पत्रकारितेतील अनुभवातून मिळालेली शिकवण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत आत्मविश्वास वाढवला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ शासकीय नोकरी मिळवणे हेच ध्येय न ठेवता समाजात परिवर्तन घडवण्याचा दृष्टीकोन ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला. तसेच, यश मिळवायचे असेल, तर अडथळ्यांना घाबरू नका, त्यांचा सामना करा, अशा प्रेरणादायी शब्दांत कृषीवलचे सहयोगी संपादक सुयोग आंग्रे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका तपस्वी गोंधळी आणि रायगड भूषण तथा स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी यांनी केले होते. स्पर्धा विश्व अकॅडमीने अशा प्रकारच्या मार्गदर्शन सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम सुरू ठेवले असून भविष्यातही विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## नफ्याच्या आमिषाने डॉक्टराची फसवणूक

**पनवेल :** नावडे येथे एका डॉक्टराची लाखोंची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. भरघोस परताव्याच्या आमिषाने १६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती समोर येत आहे. नावडे येथील एका डॉक्टरला ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारामध्ये अज्ञात व्यक्तीने नफ्याचे आमिष दाखवून ही फसवणूक केली आहे. अधिक तपास नावडे पोलीस करीत आहेत.

# रमेश म्हात्रे यांची बढती



| शिहू | वार्ताहर |

नागोठणे महसूल विभागात मंडळ अधिकारी पदावर कार्यरत असणारे शिहू गावचे रमेश म्हात्रे यांना वरच्या स्तरावर बढती मिळाली आहे. त्यांची नायब तहसीलदारपदी नेमणूक झाली आहे. यापुढे ते नवी मुंबईतील बेलापूर येथे नायब तहसीलदार म्हणून कारभार पाहणार आहेत. आतापर्यंत त्यांची ३२ वर्ष सेवा झाली असून पोयनाड मंडळ अधिकारी व नागोठणे मंडळ अधिकारी म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

यावेळी बोलताना रमेश म्हात्रे यांनी सांगितले की, ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर कामात कसुरता किंवा दिरंगाई न करता सर्व सामान्यांची केलेली कामे हिच माझ्या कामाची पोचपावती आहे. म्हणूनच मला हे फळ मिळाल्याचे त्यांनी सांगितले. शिहू सारख्या ग्रामीण भागातील पहिले एवढे मोठे अधिकारी होण्याचा मान रमेश म्हात्रे यांना मिळाला आहे. त्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पत्नीला नोकरी देण्याची मागणी

| चिरनेर | प्रतिनिधी |



चिरनेर येथील कंत्राटी वीज कामगार महेंद्र पाटील हे बुधवारी (दि.१६) येथील विद्यूत खांबावर चढून वीज दुरुस्तीचे काम करत होते. त्यावेळी त्यांना विजेचा धक्का लागून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घरातील कर्ता पुरुष अचानक गेल्याने कुटुंबियांवर मोठे संकट ओढावले. महेंद्र पाटील यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले आणि वयोवृद्ध वडील असे कुटुंब आहे. मात्र, त्यांच्या दुर्दैवी निधनामुळे घराचा सारा भार त्यांच्यापत्नीवर पडला आहे. त्यांच्या कुटुंबियांना चिरनेर गावासह आजूबाजूच्या गावातील नागरिकांनी आर्थिक मदतीचा हात दिला आहे. मात्र, ही मदत तात्पुरत्या स्वरूपाची असून, महावितरण कंपनीने त्यांच्या पत्नीला नोकरी आणि भरीव अशी आर्थिक मदत करावी, अशी मागणी चिरनेरच्या ग्रामस्थांनी केली आहे.

## घरफोडीत हजारोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमधील दोन ठिकाणी चोरट्याने केलेल्या घरफोडीत रोख रकमेसह इतर वस्तू चोरून गेल्याची घटना घडली आहे. हरी कृष्ण बिल्डिंगमध्ये राहणारे वंदना डोळस व मनोहर मोहिते यांच्या घराचे लॉक तोडून चोरट्याने आत प्रवेश केला. घरातील कपाट फोडून जवळपास २० हजार रुपयांची रक्कम लंपास केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# शेकापतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत शेतकरी कामगार पक्षाने तरुणांच्या नोकऱ्यांचा प्रश्न हाती घेतला आहे. त्या माध्यमातून शेकापकडून रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय येथे हा रोजगार मेळावा होणार असून इयत्ता आठवी उत्तीर्ण ते पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी हा मेळावा असणार आहे.

कर्जत शेतकरी कामगार पक्षाने नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकारिणीकडून तरुणांना पक्षाकडे आकर्षित करण्याच्या उद्देशाने रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या माध्यमातून तरुणांमध्ये शेकापच्या लढावू वृत्तीबद्दल आणि शेतकरी, रोजगार विषयक चळवळीबद्दल ठोस भूमिका घेण्याचा प्रयत्न शेकापचे तालुका चिटणीस मंडळ करणार आहेत.

शेकाप कर्जत तालुक्याचे चिटणीस तथा आरडीसीसीचे संचालक तानाजी मते, पक्षाचे राज्य खजिनदार अतुल म्हात्रे, जिल्हा खजिनदार श्रीराम राणे यांनी कर्जत तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने प्रथमच रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. कर्जत येथील कोकण द्यानपीठ महाविद्यालयात आयुक्त करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात किमान ५०० तरुणांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ब्लिंकिट आणि गोदरेज सारख्या कंपन्या या रोजगार मेळाव्यात सहभागी होणार असून शेकापकडून तरुणांना १०० टक्के रोजगाराची हमी देण्यात आली आहे.

## निवडक



### पेढांब्यात विधी बाल साक्षरता शिबीर

**वाघ्रण :** विद्यार्थ्यांचा विश्वास म्हणजे समाजाचा विकास, असे प्रतिपादन जिल्हा न्यायालय अलिबागच्या दिवाणी वरिष्ठ न्यायाधीश तेजस्वीनी निराळे केले आहे. पेढांबे येथे शुक्रवारी (दि.१८) विधी बाल साक्षरता शिबिराचे आयोजन येथील रा.जि.प. शाळेत करण्यात आले होते. त्यावेळी त्या जिल्हा विधी प्राधीकरण सचिव आणि कार्यक्रम प्रमुख म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातील विधी प्राधीकरण स्वयंसेवक ग्रामपंचायत सदस्य रुपेश पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. कार्यक्रमात विधी प्राधिकरण स्वयंसेवक दिपक यशवंत पाटील यांनी प्रथम मनोगत व्यक्त केले. त्यानंतर ॲड. मनिषा नागावकर यांनी 'बेटी बचाव, बेटी पढाव', तर ॲड. पियुष गाडे यांनी 'राईट्स ऑफ चाईल्ड' या विषयांवर विद्यार्थी आणि उपस्थितांना समुपदेशन केले. मुख्याध्यापिका वैशाली पाटील व सरपंच रसिका पाटील यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या शिबिरात राजिप शाळा पेढांबे आणि वाघ्रणचे ४०हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

### डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर कधी?

**तळा :** शहरातील कचरा नगरपंचायतीच्या मालकीच्या तळा घरणाजवळ टाकण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, या ठिकाणी संरक्षक भिंत नसल्याकारणामुळे तो कचरा सर्वत्र पसरला जात आहे. त्याचा नाहक त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे. येथील डंपिंग ग्राऊंड दुसऱ्या ठिकाणी हलविण्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. परंतु, अद्यापही



याच ठिकाणी कचरा टकला जात आहे. तळा नगरपंचायतीने डम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था सध्या मालकीच्या तळा धरणाजवळ केली आहे. शहरातील सर्व गोळा केलेला ओला व सुका कचरा एकत्रित या ठिकाणी टाकला जातो. मात्र, या डम्पिंग ग्राऊंड सभोवती संरक्षक भिंत न बांधल्यामुळे मोकाट गुरे, कुत्रे व पक्षांनी तो पसरला जात आहे. त्यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते. जवळच तहसिल कार्यालय असल्याने याठिकाणाहून ये-जा करणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तसेच, डम्पिंग ग्राऊंड शेजारीच निम्म्या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बोअरवेल मारण्यात आली आहे. डम्पिंग ग्राऊंडवर टाकलेला हा कचरा कुजून जमिनीद्वारे पाण्यात मुरले जात आहे. त्यामुळे याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर शहरातील आंबेळी येथे नगरपंचायतीच्या मालकी हक्क असलेल्या जागेत होणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगितले गेले होते. त्यानुसार त्या ठिकाणी काम ही पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, त्या ठिकाणी डम्पिंगला ग्रामस्थांच्या असलेल्या विरोधामुळे अद्यापही धरणा शेजारीच शहरातील कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे तळा शहरातील कचऱ्याची समस्या बिकट होत चालली असून उन्हाळी हा कचरा जाळला जात असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होत आहे.

### अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिन साजरा



**रसायनी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिनी ग्रामपंचायत तुराडे येथे साजरा करण्यात आला. यावेळी विश्वनाथ गायकवाड यांनी उपस्थिताना अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती दिली. अण्णा भाऊंचे संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा, मुंबई महाराष्ट्रातच राहावी, कामगारंचे प्रश्न तसेच महाराष्ट्रासाठी त्यांचे योगदान आसल्याचे सांगितले. यावेळी रंजना गायकवाड, मालती वाघमारे, रिया माळी, स्नेहा गायकर, अस्मिता मोकल, विश्वनाथ गायकवाड, कृष्णा झोंबाडे, काशिनाथ खुडे, विनोद कांबळे, प्रथमेश गायकवाड, दादु काळोखे, लंकेश खवले, सुरेश वायदंडे, मयूर गायकवाड, तुषार गायकवाड, आतिश भिंगारदिवे, वैभव गायकवाड, दत्ता कांबळे आदी मान्यवर उपस्थित होता.

## ग्रामस्थांनी वनविभागाकडे केले सुपूर्द | शंतनु कुवेसकर यांचे तरुणांना मार्गदर्शन

# खांदाड येथे आढळले खवले मांजर





| पाली/वाघोशी | वार्ताहर |

**माणगाव मधील खांदाड येथे शुक्रवारी (दि.१८) रात्रीच्या सुमारास भरवस्तीत दुर्मिळ खवले मांजर आढळून आले. येथील तरुणांनी प्रसंगावधान राखत खवले मांजराचे रक्षण करत वनविभागाकडे सुपूर्द केले. यावेळी वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी खवले मांजराबद्दल तरुणांना मार्गदर्शन केले.**

मिळालेल्या माहितीनुसार, येथील राजू पवार यांना खांदाड वस्तीलगत विचित्र वन्यजीव जमिनीवर दिसून आला. ही बाब त्यांनी तेथे उपस्थित असणाऱ्या गावकऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. ग्रामस्थांनी त्वरीत माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना संपर्क साधला. शंतनु कुवेसकर यांनी वनविभागालादेखील याबद्दल त्वरित माहिती दिली. वनरक्षक येथे पोहोचेपर्यंत जमलेल्या सर्व तरुणांना व ग्रामस्थांना खवले मांजर या प्राण्याची ओळख पटवून देत या प्राण्याबद्दल जनजागृती करत शंतनु कुवेसकर यांनी जनजागृतीपर मार्गदर्शन केले.वनविभागाचे उपवनसंरक्षक शैलेंद्रकुमार जाधव व सहाय्यक उपवनसंरक्षक रोहित चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या सूचनेप्रमाण वनपाल डी.एस. सुभेदार, वनरक्षक वैशाली भोर, पवन चौधरी, संतोष पिंगळा, राणी लिंबोरे, विवेक जाधव यांच्यामार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करून खवले मांजराला सुरक्षित ठिकाणी सोडण्यात आले.

### पूर परिस्थितीचा परिणाम

**खांदाड गावात व गावाच्या आजूबाजूच्या परिसरात खवले मांजर कायमस्वरूपी राहण्यायोग्य कोणताही नैसर्गिक अधिवास उपलब्ध नाही. त्यामुळे हे खवले मांजर सध्याच्या पूर परिस्थितीमध्ये काळ नदीच्या पूर प्रवाहात पश्चिमेकडील घनदाट जंगलांच्या पट्ट्यातून कुठून तरी वाहून येथे आल्याची शक्यता वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांनी वर्तवली आहे.**

> **खवले मांजर हा जीव जगातील सर्वात जास्त तस्करी होणारा प्राणी असून, खूप संवेदनशील आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यात त्याला सर्वोच्च दर्जाचे स्थान व संरक्षण प्राप्त आहे. या वन्यजीवाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवता खांदाड गावच्या ग्रामस्थांनी त्याचे रक्षण करून वन्यजीव संरक्षणाचे अतिशय स्तुत्य कार्य केले आहे.**
>
> **–शैलेंद्रकुमार जाधव, उपवनसंरक्षक**

# सुतारवाडीत पोलीस चौकीची गरज

| सुतारवाडी | वार्ताहर |

सध्या सुतारवाडी परिसरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच, या परिसरातून ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या सुद्धा फोपावत चालली आहे. याचदरम्यान रस्त्यावरील मोकाट गुरांना अपघात करून पलायन करणे, चोऱ्यांचे वाढते प्रमाण व भानगडी या गोष्टींचा विचार करून सुतारवाडी नाक्यावर पोलीस चौकी होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी खासदार सूनील तटकरे व मंत्री अदिती तटकरे यांनी लक्ष घालून याठिकाणी चौकी उभारावी, अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.

कोलाड-सुतारवाडी मार्गे पुणेकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग असल्यामुळे येथून हजारो लहान-मोठी वाहने सातत्याने धावत असतात. पुणे, कोल्हापूर, मिरज, लोणावळा, अहमदनगर, तसेच अन्य शहरांकडे जाण्यासाठी सातत्याने वाहने धावतात. विले भागाड परिसरामध्ये अनेक कंपन्या सुरू झाल्या आहेत. या कंपन्यांसाठी कच्चामाल पुरविण्यासाठी अनेक अवजड वाहन या परिसरातून रात्रंदिवस ये-जा करत आहेत. रिकामी अवजड वाहने सुसाट वेगाने येत असतात. पूर्वी हेटवणे ते कुडली दरम्यान अनेक अपघात झालेले आहेत. अनेक गुरांना तसेच माणसांना उडवून भयानक अपघात झालेले आहेत. अशावेळी गुन्हा नोंदवण्यासाठी दहा किलोमीटरचे अंतर कापून कोलाड येथे जावे लागते. त्यामुळे नागरिकांना खूपच त्रास होत असतो. त्यामुळे येथे पोलीस चौकीची लवकरच व्यवस्था व्हावी, अशी पंचक्रोशीतील तमाम नागरिकांची मागणी आहे.

## बोधकथा ‘स्वामी स्वरूपानंद’

रत्नागिरीला सद्गुरु स्वामींचे ओळखीचे गृहस्थ रहात असत. ते स्वामी स्वरुपानंद यांचे एकनिष्ट शिष्य व सेवेकरी होते. त्यांचे घड्याळ दुरुस्तीचे दुकान होते. त्यांचे सद्गुरुंवर व त्यांनी दिलेल्या साधनेवर त्यांची अत्यंत निष्ठा होती. दुकानात देखील फावल्या वेळेत ते साधना करीत असत. त्यात त्यांचे एवढे मन रंगत असे की, त्यांच्या हातून घड्याळ दुरुस्तीची कामे देखील वेळेवर होत नसत. त्यांनी ही गोष्ट सद्गुरु स्वामी यांना सांगितली. दुसऱ्या दिवशी दोघेही पावस येथे स्वरूपानंदांच्या घरी गेले. ठरल्याप्रमाणे त्यांनी आपली अडचण स्वरूपानंद यांना सांगितली. स्वामींच्या तेजस्वी प्रसन्न मुद्रेवर उत्साह दिसू लागला. ते आपल्या नेहमीच्या गोड व मृदू आवाजात म्हणाले, देव सर्व काळजी घेईल, देवाला दुरुस्तीचे काम जमणार नाही, असे वाटते का?

**सद्गुरू स्वामी बोध**

विकल्प हे वाटमारे आहेत. ते या अध्यात्म मार्गावर टपून बसले आहे. या मार्गावरून जाणाऱ्यांचा वध करण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. आपण सर्वजण देव मानणारे आहोत. तो कृपासिंधु आहे, दिनांचा कैवारी आहे. इत्यादी वचनावर आपली श्रद्धा आहे. आपण सर्वजण या दिव्य मार्गाने का जात नाही? त्याचे कारण विकल्प! विकल्प किती सूक्ष्म असेल, हे एका लहानशा गोष्टीवरून दिसून येते.

# महाड तालुक्यात पशुवैद्यकीय डॉक्टरांचा अभाव

## ● शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षाचा परिणाम; जनतेमध्ये तीव्र संताप

**। महाड । प्रतिनिधी ।**

**महाड तालुक्यातील पशुधनावर आलेल्या व्यापक संकटाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात ऑक्टोबर २०२२ पासून नऊ दवाखान्यांपैकी आठ दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती झाली नसल्याची संतापजनक वृत्त समोर आले आहे. महाडमधील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे माणगावसह मोबाईल व्हॅनचा अतिरिक्त कारभार दिल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे.**



मागील वर्षभरापासून महाड तालुक्यात विविध भागांमध्ये बिबट्याने धुमाकळी घातला होता. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पशुधनाच्या संख्येवर याचा होणारा गंभीर परिणाम लक्षात घेऊन याबाबत केलेल्या सविस्तर चौकशीदरम्यान ही धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे. महाड तालुक्यातील महाड मुख्य कार्यालयासह नऊ पशुवैद्यकीय दवाखाने असून यामध्ये नाते, वाळसुरे, चांडवे, तुडील, तेलंगे, दासगाव, वरंध, महाड व पोलादपूर तालुक्यातील लोहारे यांचा समावेश आहे. मागील काही वर्षात या ठिकाणी नियुक्त असलेले वैद्यकीय अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर कंत्राटी पद्धतीने डॉक्टरांची भरती करण्यात आली होती. मात्र, प्राप्त झालेल्या माहितीनुसार ३१ ऑक्टोबर २०२२ नंतर कंत्राटी डॉक्टरांची भरती सुद्धा शासनाकडून करण्यात आली नसल्याचे संतापजनक वृत्त प्राप्त झाले आहे. मागील वर्षी महाड तालुक्याच्या करण्यात आलेल्या पशुधनाच्या आकडेवारीनुसार तालुक्यात २५ हजार ५२९ गाई, ६ हजार ५१९ म्हैस, ५ हजार ९३ शेळ्या व ६२ हजार ६७० कोंबड्या एवढ्या संख्येने विविध विभागातील शेतकरी बांधवांकडूनच पालन केले जात असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

मागील महिन्याभरापासून तालुक्यातील विविध भागांमध्ये पशुधन मोठ्या प्रमाणात विविध रोगांनी त्रस्त असून अनेक ठिकाणी गाई, म्हशी, बकऱ्या व कोंबड्या मृत्युमुखी पडल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात कृषीवलच्या प्रतिनिधींनी महाडचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. दुबल यांना विचारणा केली. यावेळी त्यांनी, मागील दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या साथींसंदर्भात आपण स्वतः विविध विभागात फिरून शेतकरी बांधवांना याबाबतची काळजी घेण्याबाबत तसेच औषधोपचार करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे सांगितले.

शासनाकडून शेतकरी बांधवांसाठी केल्या जाणाऱ्या विविध घोषणा या अनेकदा प्रत्यक्ष स्वरूपात येत नाहीत, अशा तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. त्यातच शेतकरी बांधवांच्या महत्त्वपूर्ण असलेल्या पशुधनाच्या उपचारा संदर्भात मागील तीन वर्षांपासून आठ दवाखान्यांतून पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्त केले नसल्याने महाड पशुवैद्यकीय दवाखान्यात असलेल्या दोन डॉक्टरांवर ही जबाबदारी आली आहे. यापैकी एक महिला वैद्यकीय अधिकारी रजेवर असल्याने एकाच डॉक्टरांना संपूर्ण तालुक्यासह अन्य तालुक्यातील जबाबदारी पार पाडावी लागत आहे. त्यामुळे शासनाने महाड तालुक्याच्या असलेल्या भौगोलिक स्थितीचा अभ्यास करून ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांच्या पशुधनाबाबत तातडीने निर्णय घेऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्यात, अशी मागणी तालुक्यातील शेतकरी बांधवांकडून करण्यात येत आहे.

## पराग पाटील यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील पराग कमळाकर पाटील यांचे नुकतेच निधन झाले. निधनासमयी ते ५५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, मुलगा, मुलगी व सुन असा परिवार आहे. अलिबागमधील



जेएसएम कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे ते छोटे बंधू होते. पराग पाटील हे यशस्वी उद्योजक होते. पेणमधील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या इंजिनिअर कॉलेजमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक ते उद्योजक असा त्यांचा प्रवास होता. गार्डन आणि फार्म डेव्हलपमेंट, ठिबक सिंचनाचा उद्योग त्यांनी सुरु केला होता. आपल्या जिद्दीच्या व मेहनतीच्या जोरावर त्यांनी या क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करून ठेवली होती. आपल्या उद्योगातून ग्रामीण भागातील दहाहून अधिक बेरोजगार तरुणांना रोजगाराचे साधन त्यांनी खुले करून दिले होते. अनेक नामवंत उद्योजक, सिनेकलाकर, व्यावसायिक यांच्या फार्म डेव्हलपमेंटचे काम त्यांनी केले होते. मुंबई विमानतळ, म्हैसूर येथील इन्फोसिस कॅम्प्स, गोव्यातील रिसॉर्ट येथे ठिबक व तुषार सिंचनचे काम त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत केले होते. व्यवसाय सांभाळत असताना त्यांना क्रीडा क्षेत्राचीदेखील आवड होते. पराग पाटील यांच्या निधनाने पाटील कुटूंबियात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

# खड्ड्यात वृक्षारोपण करत आंदोलन

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**



पाली-खोपोली राज्य महामार्गावरील धोकादायक व जीवघेण्या खड्ड्यात नागरिकांनी शनिवारी (दि.१९) वृक्षारोपण आंदोलन करून आपला आक्रोश व्यक्त केला. याआधी प्रशासनाला याबाबत निवेदन दण्यात आले होते. प्रशासनाने तात्काळ कारवाई करत शहरातील खड्डे बुंजवले. परंतु, त्यांनी राज्यमार्गावरील खड्ड्यांकडे दुर्लक्ष केल्याने हे तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे. यावेळी हातात विविध माहिती फलके घेऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. वृक्षारोपण आंदोलन करून देखील प्रशासनाला जाग आली नाही तर रास्ता रोखो करून आणखीन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशार आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

पाली-सुधागड संघर्ष संस्था व नागरिकांनी पाली शहरातील व पाली-खोपोली राज्य महामार्गावरील खड्यांसंदर्भात अर्ज विनंती व आंदोलनाद्वारे प्रशासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले आहे. परंतु, अद्याप ही समस्या सोडवली जात नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. शहरासह पाली-खोपोली राज्य महामार्गावरील जीवघेणे खड्डे कायमस्वरूपी न भरल्यास शनिवारी (दि.१९) या सर्व खड्ड्यांत वृक्षारोपण आंदोलन केले जाईल याबाबत संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने पाली नगरपंचायतने लागलीच पालीतील रस्त्यांवरील खड्डे भरण्यास सुरुवात केली. तसेच, मोठे खड्डे सिमेंट कॉंक्रिट द्वारे भरण्यात आले. मात्र, एमएसआरडीसीने पाली-खोपोली राज्य महामार्गावरील खड्डे भरले नाहीत. त्यामुळे नागरिकांनी येथे आंदोलन केले आहे. या आंदोलनादेखील फरक पडला नाही तर तीव्र आंदोलन छेडून रास्ता रोको करण्यात येईल, असे नागरिकांनी सांगितले आहे. या संदर्भात माहिती घेण्यासाठी कृषीवलच्या प्रतिनिधीने एमएसआरडीसीचे एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## उपाध्यक्षपदी देवेंद्र पाटील यांची निवड

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी परिसरातील देवळोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच आणि सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र पाटील यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी देशपातळीवर कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण रायगड जिल्ह्याची मान उंचावली आहे. फेडरेशनच्या मुख्य कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर कच्छी यांच्याहस्ते देवेंद्र पाटील यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



## औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची दुरवस्था

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

औद्योगिक लोटे परशुराम वसाहतीमधील रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. विविध कारणांसाठी खोदण्यात आलेले रस्ते ठिकठिकाणी खचले असून सर्वत्र चिखल झाला आहे. या रस्त्यावरुन प्रवास करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती तत्काळ न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा उद्योजक संघटनेने एम आयडीसी अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, औद्योगिक वसाहतीत येणारा एक्सल फाटा ते तलारी वाडी, तसेच तंत्र केम कंपनी समोरुन उद्योग भवनपर्यंतच्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्ते ठिकठिकाणी खचले आहेत. पावसामुळे सर्वत्र चिखल झाला आहे. वारंवार खड्ड्यातून गाड्या घसरुन अपघात होत आहेत. त्यामुळे हे रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करावेत, अन्यथा आंदोलन छेडू, असा इशारा दिला आहे. हे निवेदन एमआयडीसी चिपळूणचे उपअभियंता आर.एस. पिंपळे व सहाय्यक अभियंता के.ए. हळदणकर यांना देण्यात आले आहे. यावेळी उद्योजक संघटनेच अध्यक्ष ॲड. राज आंब्रे, रामकृष्ण कुलकर्णी, राजकुमार जैन, मिलींद बारटक्के, डॉ. प्रशांत पटर्वधन, किसन चव्हाण, संकेत मेहता उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य २० ते २६ जुलै २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### उच्चस्तरावर आनंद घ्याल

**मेष :** मेषराशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले बरीच महत्त्वपूर्ण पदांवर बसलेल्या लोकांशी संबंध स्थापित केले जातील, जे भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरतील. या कलावधीत आपण खूपच स्वतंत्र अनुभवाल आणि अनेक निर्णय घ्याल. पण आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे की, कधीकधी आपले निर्णय चुकीचे असू शकतात. म्हणूनच काही ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच कार्य करा, अन्यथा नफ्याच्या ठिकाणी तोटा होण्याची शक्यता आहे. जर आपण चांगले व्यवस्थापन केले तर हा कालावधी आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम कालावधी पैकी एक असेल. म्हणून या दिवसांमध्ये आपण वाहन विकत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, जेणेकरून आपण एका चांगल्या वाहनाचे मालक होऊ शकता. या दिवसांत, आपण उच्चस्तरावर आनंदाचा आनंद घ्याल आणि आपल्या सुविधांवरही चांगला खर्च कराल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना-** हा कालावधी आपल्यासाठी पायघड्या घालून ठेवलेला असेल. जे कराल त्यात यश मिळू शकते. पैसा जपून ठेवण्यास शिका. **शुभ दिनांक-** २१,२३.

### व्यपसायामध्ये नावलौकिक मिळवाल

**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यवसायामध्ये आपण नावलौकीक मिळवू शकता. चालू कालावधी आपल्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकेल, कारण आपण आपल्या क्षेत्रात चांगले यशस्वी होण्याची अपेक्षा करू शकता. म्हणून प्रत्येक संधीचे भांडवल करण्यास सज्ज व्हा आणि उच्च यश मिळवा. म्हणून नोकरी मिळवण्यासाठी जर आपण या दिशेने प्रयत्न करीत असाल तर आपले प्रयत्न थोडेसे वाढवा आणि देवाच्या कृपेने आणि आशीर्वादाने आपण या कालावधीत एक चांगली नोकरी मिळेल. सोबत जीवनसाथी मिळवू शकाल. या राशीच्या लोकांच्या व्यवसाय भागीदारीमध्ये ग्रहांच्या प्रभावाचा बराच फायदा होईल. आपली आर्थिक गुंतवणूक करताना तुम्ही बरेच गृहपाठ केले पाहिजे, तरच तुम्ही त्या कामात यशस्वी व्हाल. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक-** २२,२४.

### रोमांचक अनुभव मिळतील

**धनु :** धनुराशीसाठी आपले ग्रहमान पाहता या कालावधीत बरेच रोमांचक अनुभव घ्यायला मिळतील आणि काहीतरी नवीन शिकण्यासही मिळतील. या सप्ताहात आपण बऱ्याच ठिकाणी सहली करणार असाल. पण या सहलींमुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून संपूर्ण नियोजनासह सहलीला जा. विशेषतः ही वेळ असेल जेव्हा आपण वाहन काळजीपूर्वक चालवावे आणि आपल्या खण्यापिण्यावर विशेष लक्ष द्यावे, त्याव्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्याच्या भांडणात जाणे टाळावे लागेल आणि मांस, मद्यपान आणि धूम्रपान करण्यासारख्या व्यसनांपासून दूर राहावे लागेल. तरीही हा कालावधी आपल्यासाठी खूप चांगला आणि महत्त्वाचा दिसत आहे. काहीतरी नवीन शिकण्यासाठी आपल्याला काही नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. बऱ्याच प्रकरणांमध्ये आपल्याला बऱ्यापैकी मोकळेपणाने आणि नवीन गोष्टी शिकण्यात रस वाटेल. **महिलांना-** आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक-** २०,२५.

### प्रलंबित इच्छा पूर्ण होतील

**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या जातकांना मिश्रित निकाल मिळेल. या कालावधीत आपले समंजस पणाचे कौशल्य वाढेल. त्यामुळे नातेसंबंध वाढतील आणि आपण निसर्ग आणि आयुष्यातून बरेच काही शिकू शकाल. काही नवीन मित्रही बनतील. सुरुवातीला या काळात आपण भविष्यासाठी बऱ्याच योजना तयार कराल, ज्यामध्ये आपणास यश मिळेल आणि आपल्या बऱ्यापैकी प्रलंबित इच्छा पूर्ण होतील. आपण या कालावधीत आपल्या जीवनात प्रेमाचे आणि प्रणयरम्यतेचे स्वागत करण्यास तयार असावे. जर आपण आधीपासूनच घरघूती नात्यात असाल किंवा एखाद्या माहितीचा शोध घेत असाल तर या प्रकरणात आपल्याला आनंद देण्यासाठी आपले ग्रह कार्य करतील. या कालावधीत आपले विवाह देखील होण्याची शक्यता आहे. **महिलांना-** तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक-** २०,२१.

### हा सप्ताह भरभराटीचा जाईल

**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहात शनी राशीच्या या कालावधीत परदेशी सहलींचे योग बनले आहेत, म्हणून जर तुम्ही आताच या दिशेने प्रयत्न करीत असाल तर या वेळेचा पुरेपूर फायदा घेण्यास तयार व्हा. जर आपण लहान व्यवसाईक असाल तरी आपल्याला या कालावधीत बदलीचे योग आहेत. आपण आपल्या घरापासून दूर काम करत असल्यास, यावर्षी आपण आपल्या घराजवळ येऊ शकता. जर आपला एखादा व्यवसाय असेल तर आपल्याला त्यासंदर्भात बरेच प्रवास करावे लागतील, जेणेकरून आपला व्यवसाय संबंध दृढ होईल. आपण कोणत्याही सर्जनशील कामात व्यस्त असल्यास हा सप्ताह भरभराटीचा जाऊ शकतो. या कालावधीत आपल्याला काही किरकोळ त्रास आणि अडचणींना सामोरे जावे लागेल आणि काही कठीण आव्हानांवर मात करावी लागणार आहे. आपण खूप उत्साहित व्हाल. आपल्या ऊर्जेच्या मदतीने प्रत्येक आव्हानाचा सामना कराल आणि त्यात यश मिळवाल. सुरवातीला संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा. **महिलांना-** घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभदिनांक-** २०,२३.

### अपूर्ण कामे पूर्ण होतील

**मकर :** मकरराशीसाठी ग्रहमान पाहता या साप्ताहात काही अपूर्ण कामे पूर्ण झाल्यामुळे आराम मिळेल आणि काही नवीन कामेही सुरू करता येतील. तुम्ही बऱ्याच काळापासून असलेल्या संकटातून मुक्त व्हाल आणि एक नवा अध्यायाचा श्री गणेश कराल. या कालावधीत या राशीच्या जातकांना दुःखापासून आराम मिळेल आणि जीवनाच्या चक्रात आनंदाची प्राप्ती होईल. चालू कालावधी आपल्याला अनेक प्रकारच्या यात्रांमध्ये व्यस्त ठेवेल, परंतु ही यात्रा शुभ आणि कल्याणकारक असेल ही आनंदाची बाब आहे. आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह आकर्षक आणि सुंदर पर्यटन स्थळावर प्रवास कराल. आपण जीवनाच्या नवीन टर्निंग पॉइंटमध्ये प्रवेश कराल, जिथे आपणास पाहिजे तसे करण्यास भरपूर स्वातंत्र्य मिळेल. आपण आपल्या ऊर्जेसह आपल्या कामात यश मिळवाल. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. पर्स फुगलेली राहील, खर्चासाठी रक्कम येईल. **शुभदिनांक-** २१,२३.

### मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील

**मिथुन :** मिथुनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीचे लोक प्रेमाच्या बाबतीत खूप रोमँटिक असतात आणि एखाद्यावर मनापासून प्रेम करतात. या व्यक्तींना आपल्या अहम आणि आवेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असेल कारण हेच सर्व पुढे तुमच्या लव्ह लाईफमध्ये अडचणी आणू शकतात. आपण त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असावे म्हणून या सप्ताहात आपला अहंकार बाजूला ठेवा आणि आपल्या जोडीदारावर प्रेम करा. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. या सप्ताहात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **महिलांना-** कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. झोप व खाणे वेळेवर करा. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** २३,२४.

### स्वतःवरील विश्वासामुळे पुढे जाल

**तुळ :** तुळराशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या कालावधीत आपण खूप आशावादी असाल आणि स्वतःच्या विश्वासामुळे पुढे जाण्यासाठी आपल्याला अनेकांकडून प्रोत्साहित केले जाईल. परंतु, त्यामध्ये कोणतेही काम करण्यापूर्वी आपण पुरेशी तयारी करणे आवश्यक आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. या सप्ताहात आपल्याला मुख्यतः आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. कारण कदाचित ही तुमची कमकुवत बाजू असेल. अचानक बदलणारे वातावरण आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकते. नियमित आणि चांगल्या दिनचर्या पाळा आणि निरोगी राहा. परंतु, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अत्यधिक आवेगाने कार्य केल्याने आपल्या सभोवतालच्या लोकांवर परिणाम होईल, म्हणून संयमाने काम करा. आपल्याला बरेच कठीण कार्ये पूर्ण करावे लागतील, ज्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल. **महिलांना-** या दिवसांत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक-** २१,२४.

### परेदशात जाण्याची संधी

**कुंभ :** कुंभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या कालावधीत तुम्ही स्वतः बरोबरही वेळ घालवला पाहिजे, कारण यामुळे तुम्हाला आंतरिक मजबुती मिळेल आणि तुमची इच्छाशक्ती वाढेल. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना या सप्ताहात काही चांगली बातमी मिळू शकेल. पूर्वी केलेल्या मेहनत आणि परिश्रमांचे निकाल आता सहज मिळू शकतात. काही लोकांना वडिलोपार्जित मालमत्ता मिळण्याचीही शक्यता आहे. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या. सप्ताहाचा मधला कालावधी व्यापारी वर्गासाठी चांगला राहील. परदेशी सहल देखील होऊ शकतात. जे लोक नोकरी करीत आहेत त्यांची अचानक बदली होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे ते थोडे विचलित होऊ शकतात. आपण कोणत्याही तीर्थयात्रसाठी देखील जाऊ शकता, तसा योग आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या काही समस्या कमी होतील. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. डोक्यातला राग दाबून ठेवू नका, रक्तदाबाची काळजी घ्या. **शुभदिनांक-** २३,२४.

### प्रत्येक कार्यात यश मिळेल

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला काही नवीन संधी मिळतील आणि त्या संधीमुळे आपल्याकडे संपूर्ण ऊर्जा आणि तग धरण्याची क्षमता देखील वाढलेली असेल. आपण आपला हात ज्या कार्यात ठेवाल त्यात आपल्याला यश मिळेल आणि आपले सर्व उद्योग सुरळीत चालू होतील. या कालावधीत सुरुवातीस आपण कमी अंतराच्या सहली जास्त कराल आणि आपल्याला यामुळे फायदाही होईल. सप्ताहाच्या सुरुवातीस आपण यात्रेवर देखील जाऊ शकता. या व्यतिरिक्त, सामाजिक कार्याशी संबंधित कामकाजामुळे आपण काही सहली देखील करू शकता. आपले परदेशी जाण्याची चांगली शक्यता आहे. यावेळी आपल्या बऱ्याचदिवसांपासून प्रलंबित असलेल्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचे मनोबल देखील वाढेल. यादरम्यान आपण आपले घर तयार करण्यासाठी किंवा मालमत्ता खरेदीसाठी कर्ज घेऊ शकता. **महिलांना-** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक-** २५,२६.

### किमती वस्तूची खरेदी होणार

**वृश्चिक :** वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात आपण आपल्यासाठी हे दिवस संभाव्यतेचे आहेत आणि आपल्या स्वतःस प्रत्येक कठीण उद्दिष्ट साध्य करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आपल्या भावंडांशी चांगला संबंध ठेवा आणि वादविवाद होऊ देऊ नका. लक्षात ठेवा आपण फक्त भावंडांच्या मदतीने पुढे जाऊ शकाल. आपणास अशा मित्रांचे सहकार्य देखील मिळेल जे आपल्याला सकारात्मक विचारसरणीसह पुढे जाण्यास प्रोत्साहीत करतील. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आपली आई-मामा कडील माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिंचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक -** २५,२६.

### यशस्वी व्यक्ती म्हणून उदयास याल

**मीन :** मीनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या वडिलांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करा, यामुळे फक्त तुम्हाला नशिबाची साथच मिळणार नाही तर तुमची प्रगती देखील होईल. या सप्ताहात तुम्हाला काही कठीण निर्णय घ्यावे लागतील. कदाचित यामुळे तुम्ही दुखावले जाऊ शकता. तुमच्याकडे प्रत्येक कठीण काळात आणि आपल्या मनोबलातून बाहेर पडण्याची क्षमता तुम्हाला सक्षम बनवू शकते. जरी आपल्याला असे निर्णय घ्यावे लागले तरीही घाबरू नका. कारण हे आपल्या भविष्यासाठी खूप चांगले आहे. एकंदरीत, हा कालावधी या राशीच्या लोकांना मिश्रित परिणाम देईल आणि आपण आपल्या मनोबल आणि परिश्रमांच्या बळावर बरेच लक्ष्य साध्य करू शकता. आपण आपल्यातील काही कमतरता दूर करून यशस्वी व्यक्ती म्हणून उदयास याल. **महिलांना-** हा असा एक सप्ताह असेल ज्यात आपल्यास साहस, प्रेम आणि आपल्या प्रियजनांचा साथ ही असेल. आपल्याला आपली क्षमता त्याच्या पूर्ण संभाव्यतेसाठी आणि या कालावधीसाठी वापरावी लागणार आहे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभदिनांक-** २१,२५.

# सुरक्षा कोणाची ? उपेक्षा कोणाची ?




डॉ.विलास ज. पवार

**महाराष्ट्र सरकारने विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मांडले. त्यानंतर ते बहुमताने मंजूर करण्यात आले आहे. जनसुरक्षा कायदा हा एक अजामीनपात्र आणि प्रतिबंधात्मक कायदा आहे. या कायद्यानुसार, जर सरकारला वाटत असेल की एखादी व्यक्ती सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी किंवा राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका आहे, तर त्या व्यक्तीला कोणत्याही आरोपाशिवाय ताबडतोब ताब्यात घेतले जाऊ शकते. जनसुरक्षा कायद्याचा हेतू त्यामुळे संशयास्पद ठरू शकतो.**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले. जनसुरक्षा कायदा कोणासाठी? कशासाठी? ह्या प्रश्नांची उत्तरे कोणत्याही बाजूने समाधानकारक नाही. मुळात, कायद्याची गरज आणि कायद्याचे साधन म्हणून वापर कशासाठी होणार याबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. डाव्या विचारसरणीच्या संघनाच्या अतिरेकी, नक्षलवादी कारवाईस पायबंद घालणे, हा या विधेयकाचा मूळ उद्देश आहे, असे सांगण्यात येत आहे. हे ठणकावून सांगितले जाते म्हणून खरे मानायचे का? हे समजून घेणे गरजेचे आहे. नक्षलवादी अतिरेकी कारवाया हे निर्बंध लादण्यासाठी असायलाच हव्या आहेत. नक्षलवादी, अतिरेकी कारवायातून हिंसाचाराचा जन्म होत आहे, तर त्याचा खात्मा करायलाच हवा. हिंसाचाराचे बळी, हिंसाचाराची झळ ज्यांना बसली आहे त्यांना याचे दुःख अधिक जास्त आहे. हिंसाचार जर डाव्या विचारातून जन्माला आला, तर त्याचे दुःख करायचे आणि उजव्या विचारसरणीत जन्माला आला तर त्याला न्याय आंदोलन म्हणायचे का? हे असे वाटण्याचे कारण आहे की हिंसाचार हा डावा-उजवा आहे का, हे ठरवून त्याचा बंदोबस्त करता येणार आहे का? हा हिंसाचार ज्या बळी पडलेल्यांच्या वाट्याला आला त्याचे काय? त्यांच्या हालअपेष्टा डावे-उजवे करून चालणार आहेत का? कोणत्याही सरकारने कायदा करताना डावे उजवे करणे कितपत योग्य ठरणार आहे? जनसुरक्षा कायद्याचा हेतू त्यामुळे संशयास्पद ठरू शकतो. आपण लोकशाहीप्रणालीतून राज्यकारभार करतो, त्यामुळे जनमनाचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

लोकशाहीचा विचार डावे आणि उजवे करणारा नाही हेसुद्धा समजून घ्यायला हवे आहे. उजवे, डावे ही संकल्पनाच मुळात लोकशाहीची नाही. रोमन सम्राटाच्या दरबारातील उजवे आणि डावे ही संकल्पना आहे. विचाराच्या बाजूने, समर्थन करणारे, सम्राटाच्या उजव्या बाजूला बसायचे आणि त्या विचाराला विरोध किंवा विचारांचे खंडन करणारे डाव्या बाजूला बसत असत यातूनच ही डाव्या आणि उजव्या विचारांची संकल्पना पुढे आली आहे. पण ही जनसुरक्षा कायद्याच्या निर्मितीसाठी नाहीच आहे. कारण हा कायदा लोकशाही तत्वांना पाळणारा सर्वांसाठी सारखा असायला हवा तरच तो यशस्वी होऊ शकेल. कोणत्याही विचारसरणीतून कोणताही हिंसाचार निर्माण झाला. अनुचित घटना घडली तर ती विचारसरणी डावी कोणती, उजवी कोणती, याचा लोकशाही विचारसरणीतून निर्णय कसा करता येणार? सरकारने घेतलेल्या निर्णयाला शेतकऱ्यांनी त्यांचे नुकसान होत असेल तर विरोध केला, आंदोलन केले. कायदा सुव्यवस्था बिघडली तर शेतकऱ्यांच्या या कृतीला जनसुरक्षा कायद्यान्वये गुन्हा ठरवावा लागेल. व्यक्ती, संघटना यांनी शाब्दिक अथवा कृतीद्वारे, सार्वजनिक सुरक्षा, शांतता याला धोका निर्माण करणे किंवा शांतता सुरक्षा सांभाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या सरकारच्या प्रयत्नात बाधा आणणे, हिंसक कृत्य करणे, हिंसाचारास उत्तेजन देणे, जनतेच्या मनात दहशत निर्माण करणे, आशाभंग कायदेभंग यांना उत्तेजन देणे यासाठी निधी साहित्य जमा करणे इत्यादी व्याख्या केली आहे, अशा जनसुरक्षा कायद्याचीनिर्मिती होतानाचा ढिसाळपणा दाखवून दिला आहे. वीज महामंडळाचा वीज बिल असेल, सरकारी बँकांची नोटीस असेल वा अन्य कोणत्याही शासनाचा आदेश असेल तर त्याबाबत न्याय बाजू मांडणे याला विरोध ठरवले जाणार का? अन्याय्य निर्णय पाळण्यास नकार देणे, कायदेभंग ठरणार का? एखादा समूह एकत्र येऊन स्वतःचा न्याय्य हक्क मिळविण्यासाठी एकत्रित एकजूटपणे विचार मांडत असेल तर त्याला या कायद्याने कारवाई करणार का? हा कायदा निर्माण करण्यात आला तर त्याचे प्रयोजन असेलच ना? सविनय विरोध न्याय मागण्यांसाठी असेल तर हा विरोध सरकार मोडून काढणार तर कोणत्या थरापर्यंत जाणार? या कृतीला सरकारने केलेला हिंसाचार म्हणायचे का? या सर्व प्रश्नांना जनसुरक्षा कायद्याने निर्मिती होताच जन्माला घातले आहे. या कायद्याची निर्मिती होत असतानाच आमदार भवनातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या आमदाराला सरकारने काहीही कारवाई न करता पाठीशी घातले यामुळे या कायद्याची उपयुक्तता संशयास्पद होताना दिसली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कायद्याचा हेतू स्वच्छ आहे हे आ. गायकवाड यांच्या अमानुष कृतीच्याबाबत शासन करून दाखवता आले असते. परंतु घटकपक्ष युतीचा धर्म याचा विचार त्यांना करावा लागतो, असे मानणे म्हणजे कायद्याचे अपयश अधोरेखित करते आहे. अशा अनेक घटना शोधता येतील की जनसुरक्षा कायदा अंमलात आणून त्यांची अंमलबजावणी राजकारणाच्या दृष्टीने तोडमोड केली जाते. अशा अनेक गोष्टी दिसून येतात त्याची थोडीफार लाज कायदे करणाऱ्यांना वाटायला पाहिजे.

या कायद्याअंतर्गत अर्बन नक्षल ही संज्ञा पुढ्यात आणून ठेवली आहे. या अर्बन नक्षलवादाला रोखणार, थांबवणार याबाबत सुद्धा सर्वसामान्यांना व कायदे पालन करणाऱ्यांना शंका आहे. अर्बन नक्षल विचार शोधणार कसा? त्यासाठी कोणत्या पद्धती वापरणार? विचार शोधणार म्हणजे शहरी भागात राहणाऱ्यांची डोकी म्हणजे तपासणार का? दुसऱ्या गोष्टीचे आश्चर्य वाटते आहे की आपल्या देशाच्या गृहमंत्र्यांनी सांगितले आहे. अगदी दोन-तीन महिन्यांपूर्वीच की आपल्या देशातून नक्षलवाद संपत चालला आहे. आपले मुख्यमंत्री जे राज्याचे गृहखाते सांभाळतात तेसुद्धा नक्षलवादाचे अस्तित्व एक-दोन जिल्ह्यांपुरतेच शिल्लक आहे सांगतात, मग हा अर्बन नक्षलवाद अशा कोणत्या जिल्ह्यात आहे आणि राज्यातल्या दोन जिल्ह्यातच हा कायदा अस्तित्वात असणार का? जर तो जिल्ह्यापुरताच आहे, तर तो राज्यव्यापी कायदा का केला गेला? आपल्या देशात आणीबाणी २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आली. या लादण्यात आलेल्या आणीबाणीबाबत सुवर्णमहोत्सवी काळा दिवस मानला गेला त्याचे जाहीर कार्यक्रमात डाव्या? की उजव्या? लोकांनी आक्रंदने मांडली आहेत. जनसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीत जर भेदाभेद मानला जात असेल, सरकारच्या बाजूचे म्हणजे उजवे त्यांना वेगळा न्याय, सरकारच्या विरोधात असणारे डावे त्यांना शासन करायचे अशा विचारसरणीला समाजकारणात काळा कायदा मानला जाईल आणि राजकारणात त्याचा हत्यार म्हणूनच उपयोग करता येईल. राज्याचे मुख्यमंत्री धडाडीचे हुशार राजकीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी जनसुरक्षा कायदा अस्तित्वात आणला तर त्याची सुरुवात आपल्या आजूबाजूने केली असती, सर्वांना सारखा न्याय अशी घोषणा केली असती तर डावे कोण, उजवे कोण हे ठरवण्याची वेळच आली नसती. डावे-उजवे ही रोमनकालिन संकल्पना आहे, त्याला लोकशाहीत थारा देण्याची गरजच नाही. **



# नवरा आमदार, तरीही मी रेशनच्या रांगेत



हेमलता कारखानीस

या हेमलताबाईचा नवरा सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आला होता. पण हेमलता यांनी आमदाराची बायको म्हणून आपले वेगळेपण अखेरपर्यंत जाणवू दिले नाही. आजच्या जमान्यात कारखानीस आमदार व्हायच्या पात्रतेचेच नव्हते असे वाटून जाते.

आमदार पत्नी मी, मग मी रेशनच्या रांगेत कशी उभी राहू? नवरा आमदार आणि एसटी. स्टँडवर बोरगावकडे जाणाऱ्या एसटीची वाट मी कशी बघत थांबू आणि नवरा एक वेळा, दोन वेळा, नव्हे सलग चार वेळा आमदार; तरी मी म्हाडा कॉलनीत सिमेंट पत्र्याच्या छताखालच्या तीन खोल्यांच्या घरात कशी राहू? असला विचारही कधी मनात न आणता जीवन जगलेल्या हेमलता त्र्यंबक कारखानीस (वय ८४) या आपल्या मृत्यूसही अगदी सहजपणे सामोरे गेल्या. त्यांचा मृत्यू झाला आणि कोठे बातमी नाही, डिजिटल फलक नाही, अलीकडे कोल्हापुरात एखाद्याच्या मृत्यूचाही गाजावाजा करायची पद्धत रूढ झाली असताना अगदी साधं कसे जगायचे हेच दाखवून त्या निघून गेल्या.

हेमलता कारखानीस या दिवंगत आमदार त्र्यंबक सीताराम कारखानीस यांच्या पत्नी. १९५७ ला ते शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून शाहूवाडी विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आणि नंतर सलग तीन वेळा कोल्हापूर शहर मतदारसंघातून ते निवडून आले. सलग चार वेळा निवडून आलेले सगळेच कर्तृत्ववान असतात असे नाही. पण कोल्हापूरचे हे आमदार कारखानीस म्हणजे विधानसभेत वाघ होते. ते विधानसभेत बोलायला उठले तर आयएस अधिकारी गांगरलेले असायचे. कारखानीसांनी एखाद्या प्रश्नात लक्ष घालायचे ठरवले तर ते मुळापासून त्यात घुसायचे आणि सरकारकडून ठोस उत्तर किंवा ठोस आश्वासन घेऊनच भाषण थांबवायचे. "थांब, तुला विधानसभेत बघून घेतो," अशी अधिकाऱ्यांना धमकी घालायची पद्धत त्यावेळी नव्हती. "दूध का दूध आणि पानी का पानी' ही परंपरा कोल्हापूरच्या या आमदाराने महाराष्ट्रात निर्माण केली होती.

अशा या कणखर आमदाराची बायको बाईसाहेब, माईसाहेब, वहिनीसाहेब म्हणूनच ओळखायला हवी होती. त्यांनी कायम स्टार्चची साडी नेसायला हवी होती. ड्रायव्हर, नोकर, कार्यकर्त्यांवर डाफरून आपली भीती निर्माण करायला हवी होती. पण या बाईने आमदाराची बायको म्हणून नव्हे तर कारखानीस या एका ध्येयवादी माणसाची बायको म्हणून जीवन व्यतीत केले. १९५७ ला हे जोडपे कपिलतीर्थाजवळ निंबाळकरांच्या वाड्यातील एका खोलीत राहत होते. कोल्हापुरात एका छोट्या खोलीत राहणारे कारखानीस मुंबईत मात्र विधानसभा हादरवून सोडत होते.

१९५७ नंतर ते पंचगंगा तालमीजवळ परीट गल्लीत राहायला गेले. त्यानंतर तीन वेळा कोल्हापूरचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले.

मतासाठी "पाकीट', "जेवण', "दारू', "दादागिरी', "जात-पात', "पै-पाहुणे' असली कधी भानगड नाही. आमदार म्हणून मिळालेले मानधन प्रवास, पुस्तक खरेदी आणि गरजूंना मदत म्हणून वाटत राहिले. त्यामुळे घरात नेहमी रडारवर असायच्या, पण हेमलता गडबडल्या नाहीत.

आपला नवरा तेवढा एकनिष्ठ तर आपणही तसेच जगायचे हे त्यांनी ठरवले. त्या रेशनच्या रांगेत उभे राहायच्या. गहू आला काय? साखर आली काय? म्हणून दुकानदाराला विचारायला जायच्या. त्यावेळी दुकानदार त्यांच्यावर उगारायचा. त्या दुकानदाराला माहीत नसायचे, की ज्या आमदाराला महाराष्ट्र सरकार घाबरते, त्याची ही बायको आपल्या दुकानाच्या दारात गिऱ्हाईक म्हणून हातात पिशवी आणि रेशन कार्ड घेऊन उभी आहे.

कारखानीसांच्या मृत्यूपर्यंत त्यांचे स्वतःचे घर नव्हते. १९९२ मध्ये म्हाडा कॉलनीत घर मिळावे म्हणून हेमलतांनी अर्ज केला. अर्ज मिळविण्यासाठी पहाटे तीन वाजता त्यांनी आपल्या मुलाला रांगेत उभे केले. सध्या त्या आपल्या मुलासमवेत म्हाडा कॉलनीतल्या (हॉकी स्टेडियमसमोर) अगदी साध्या घरात राहत होत्या.

नव्या पिढीतल्या त्यांच्या शेजाऱ्यांनाही माहीत नव्हते, की या बाईचा नवरा सलग चार वेळा आमदार म्हणून निवडून आला होता. पण हेमलता यांनी आमदाराची बायको म्हणून आपले वेगळेपण अखेरपर्यंत जाणवू दिले नाही.

हेमलतांनी हे पथ्य पाळले हे ठीक आहे. पण अशी व्रतस्थ बाई मरण पावली म्हटल्यावर स्वाभिमानी कोल्हापूरकरांनी काय केले हे देखील महत्त्वाचे आहे. अलीकडे एखाद्याच्या मृत्यूचाही गाजावाजा कोल्हापुरात जोरात केला जातो.

मरण पावलेल्या माणसाचे डिजिटल इतके लावतात, की तो मरण पावल्याचे दुःखच वाटत नाही आणि कोपऱ्या-कोपऱ्यावर लावलेल्या डिजिटल फलकाबद्दल चीड आल्याशिवाय राहत नाही. हेमलता कारखानीसांचा मृत्यू झाल्यानंतर डिजिटल नकोच; पण चार वेळा आमदार असलेल्या कारखानीसांची बायको मरण पावली एवढे तरी आपल्याला कळायला हवे होते. पण फारसे कोणाला कळालेही नाही. सध्या आमदार त्यांना मिळणाऱ्या ३० लाखाच्या गाड्या, चालकाला पगार सरकार देणार या बातम्या आता सवयीच्या झाल्या आहेत.

खालील मजकूर वाचला की आजच्या जमान्यात कारखानीस आमदार व्हायच्या पात्रतेचेच नव्हते असे वाटून जाते. हल्ली एसएमएस, फेसबुक, व्हॉटस् अॅपचा जमाना आहे. काही नाक्याला खुट्ट झाले तर शिरोली नाक्याला ते सेकंदात पोचते अशी परिस्थिती आहे. पण हेमलता कारखानीसांसारख्या ध्येयवादी बाईच्या मृत्यूला फेसबुक, व्हॉटस् अपवर स्थान द्यायला कुठे कोणाला सवड आहे. एक आदर्श व्यक्तीमत्वास भावपूर्ण श्रद्धांजली.

**संतोष द पाटील.**

# देवमाणूस देवाघरी गेला!

सलीम शेख

माणगाव येथील पोलीस खात्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वाटवे यांचे निधन होऊन आज तीन वर्ष पूर्ण होत आहेत. पोलीस खात्यातील हा देवमाणूस म्हणून सर्वत्र ओळखले जात होते. त्यांचा आज दि. २० जुलै रोजी तृतीय स्मृतिदिन असून त्यांना भावपूर्ण आदरांजली! आज त्यांना श्रद्धांजली वाहताना संपूर्ण माणगावकरांच्या तोंडीच एकच वाक्य आहे; ते म्हणजे देवमाणूस देवाघरी गेला.



कालकथित जितेंद्र वाटवे हे शांत, मनमिळाऊ व मितभाषी स्वभावाचे असे व्यक्तिमत्त्व होते. पोलीस म्हटलं की, नागरिकांच्या मनात भीती निर्माण होते. विशेषतः ग्रामीण भागात पोलिसांची गाडी आली, पोलीस दिसला की खेड्यातील लोक तेथून दूर होतात. अशी भीती पोलिसांच्या बाबतीत खेड्यातून आजही आहे. पण, जितेंद्र वाटवे यांच्यासारखे पोलिसवाले यांनी पोलीस हाच खरा जनतेचा मित्र आहे, हे त्यांनी आपल्या पोलीस खात्यात काम करताना दाखून दिले होते. माणगाव पोलीस ठाण्यात कोणी गेल्यावर त्यांची भेट घेतली असता ते नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून चांगला सल्ला देत असत. आपल्याकडे आलेल्या माणसांना चहापाणी देऊन त्यांच्याशी मन मोकळेपणाने चर्चा करीत असत, असे हे विनम्रपणे सर्वांशी मिळून-मिसळून राहणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कधीच आपण पोलीस खात्यात काम करतोय म्हणून पोलिसी खाक्या कोणाला दाखवला नाही. ते पोलीस आहेत, असे कधीच कोणाला वाटले नाही. कारण, त्यांच्यात असणारा विनम्रपणा व माणसे जोडण्याची किमया हाच खरा त्यांचा स्वभावगुण वाखण्याजोगा होता. म्हणूनच त्यांनी माणगावसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात पोलीस दलातील देवमाणूस म्हणून आपली ओळख आपल्या या प्रेमळ स्वभावाने सर्वत्र निर्माण केली होती.

दि.२० जुलै २०२२ रोजी पहाटे त्यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर काही काळातच त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या निधनाची माहिती समजताच अनेकांनी पोलीस खात्यातील देवमाणूस आपल्यातून निघून गेला अशा भावना व्यक्त करीत वाटवे कुटुंबियांसह त्यांचे मित्रपरिवार तसेच माणगावकरांसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील पोलीस खात्यावर शोककला पसरली होती. तरुण वयातच जितेंद्र वाटवे यांच्यासारख्या देवमाणसाला देवाज्ञा झाल्याने अनेकांना गहिवरून आले होते. निधनाअगोदर काही महिन्यापूर्वी त्यांना पोलीस खात्यात बढती मिळून त्यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी नेमणूक करण्यात आली होती. असे हे मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तिमत्त्व माणगावकरांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील. ते आज आपल्यातून निघून गेले, त्यास तीन वर्षे पूर्ण होत आहेत. 'अशी पाखरे येती... आणि स्मृती ठेवूनी जाती...' पोलीस खात्यातील जितेंद्र वाटवे यांच्यासारखा देवमाणूस क्वचितच आपल्याला पाहायला मिळेल, हे मात्र तितकेच खरे आहे. **



# सुख म्हणजे नक्की काय असतं?

**जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारी मना तू चि शोधून पाहे..समर्थांनी विचारी मनालाच जगातील सर्वसुखी प्राणी कोण हे शोध असे सांगीतले, आणि त्या प्रमाणे हे मन संपूर्ण सारासार विचार करून सुखी जीवाच्या शोधात निघाले असता वरपांगी सुखी दिसणारे सर्वच जीव मुळात कुठल्याश्या सुखाच्या शोधात आहेत आणि त्या सुखाच्या अभावामुळे त्यांना संपूर्ण पणे सुखी असे म्हणता येणे शक्य नाही असा मनाचा विचार झाला. सुखाची परिभाषा वगैरे करणं तसं फारच कठीण, कारण ज्याच्या त्याच्या दृष्टीने ज्याचं त्याचं सुख हे वेगळं असणार हे निश्चित, आणि म्हणून तो त्या सुखाच्या शोधात कायम फ़िरतीवर असणार हे ही निश्चित..**
**मग कसं ठरवायचं, की कोण सुखी आहे ते?**

निलेश साठे

जगी सर्व सुखी असा कोण आहे. याचे उत्तर आहे असे कोणीच नाही. प्रत्येकाला काही ना काहीतरी दुःख व्यथा वेदना कष्ट आहेतच. जगात सर्व सुखी असा कोणीच नाही. पण जो पडल्या-पडल्या जो घोरायाला लागतो तो जगातला सर्वात सुखी प्राणी असे खुशाल समजावे अशी एक व्याख्या केली जाते. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात समस्या कटकटी अडचणी या आहेतच.

प्रत्येक जण सुख शोधण्यासाठी धडपडत आहे. मग हे सुख म्हणजे नेमके असते तरी काय. सुख म्हणजे प्रत्येक ती गोष्ट जी माणसाच्या चेहऱ्यावरील खिन्नता उदासीनता दूर करून अलगत हसू फुलवते. माणसाला ज्या ज्या गोष्टींमधून समाधान मिळेल ती प्रत्येक गोष्ट म्हणजे सुख आहे.
प्रयत्न करून मिळवलेली वस्तू म्हणजे सुख आहे. अचानक आयतं घबाड मिळणे म्हणजे सुख आहे. आपल्या कसानाला विजयाची ट्रॉफी उंचावताना पाहणे म्हणजे सुख आहे. ऋतिक रोशन (इथे तुमचा फेवरेट कोणीही असू शकतो) चा नाच पाहणे सुख आहे. अमिताभची अॅक्टींग पाहणे सुख आहे. बायकोने लाडात येऊन स्वतः सुरुवात करावी म्हणजे सुख आहे. स्थिरावलेल्या सचिन विराटला बॅटिंग करताना पाहणं सुख आहे. मृत्यूच्या दाढेतून बाहेर येणे म्हणजे सुख आहे. आजारपणातून पूर्णपणे बरं होणे म्हणजे सुख आहे. सनी लियोनीला पाहणे म्हणजे सुख आहे. अचानक पगारात वाढ होणे ही (थोडावेळापुरतं मिळणारे) सुख आहे. गर्लफ्रेंड मिळणे एक सुख आहे. चौपाटीवर भेळ खाणं सुख आहे. आवडणारी कादंबरी वाचणे म्हणजे सुख आहे. विनोदी कार्यक्रम पाहणे म्हणजे सुख आहे. मुलांना एखादी सूचना केली आणि ती त्यांनी त्वरित अमलात आणली तरी ते सुद्धा एक सुखच आहे.

आवडणारी प्रत्येक गोष्ट मिळणे म्हणजे सुख आहे. सुख म्हणजे प्रत्येकाची अशी एक विशिष्ट कल्पना आहे. कुणाला कशातून सुख मिळेल याचा काही नेम नाही. प्रत्येक जण सुख मिळवण्यासाठी धडपडत आहे. गरीब तर धडपडतो आहेच. पण पैसेवाला देखील सर्व सुख विकत घेण्याच्या प्रयत्नामध्ये आहे. परंतु सुख हे विकत घेता येत नाही. तुम्ही सुविधा खरेदी करू शकता. पण सुख विकत घेऊ शकत नाही. कारण सुख म्हणजे समाधान आहे. आणि ते तुमच्या मान्यतेवर आहे. तुम्ही समाधान कशात मानतात त्यावर तुमचे सुख अवलंबून आहे.

तुम्हाला समाधान लाभले म्हणजे सुख लाभले. प्रत्येक जण आपापल्या परीने या सुखासाठी धडपडत आहे. छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद मानायला शिकले तर प्रत्येक जण सुखी समाधानी होईल. मनासारखे एखाद्या वेळेस नाही घडले तर चलता है यार असे म्हणून सोडून देतासुद्धा यायला हवं. कारण तुम्ही जी कृती करतात त्यासाठी फक्त दोनच मार्ग आहेत.

एक तर हसत खेळत आनंदाने करा किंवा मग रडत खडत करा. मग का नाही कोणतेही काम हसत खेळत आनंदाने करावे. खिलाडीवृत्तीचा स्वभाव ठेवला तर बऱ्याच छोट्या छोट्या गोष्टींमधून आनंद मिळेल समाधान मिळेल. मौज मजा करत हा-हा म्हणता लाईफ निघून जाईल, कळणारदेखील नाही. समाधानी राहा. सुखी राहा. माझी आजी मला नेहमी असाच आशीर्वाद द्यायची. **

# ‘पाणंद’ म्हणजे शेतीवाडीतील ‘कोकणी मेट्रो लाईन!’

तळकोकणातील पानाफुलांनी वेलींनी लगडलेली हिरवीगच्च ‘पाणंद’ म्हणजे कोकणी माणसांच्या शेती आणि घरे यांना जोडणारा राजमार्गच! लाल मातीच्या चिखलातून मार्ग काढत चाललेली पाणंद कित्येक वर्षे कोकणी लोकांना साथ देत आली आहे. कोकणी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गणेशचतुर्थीच्या उत्सवात वाडी-वाडीतील आरतीसाठी वाडीतील लोक पाणंदीची पायवाट तुडवित चिखलाने माखलेले पाय धुवून प्रत्येक घरात जातात, तेव्हा खळ्यात बादलीभर पाणी भरून ठेवावे लागते. त्यामुळे नकळतपणे हातपाय धुवून देवदर्शनाला जाण्यासाठीची परंपरा, रितीरिवाज निसर्गाच्या कुशीत निर्माण झालेली ही ‘पाणंद’ जतन करत आहे.तर कधी पाणंदीवरुनच भावकीमध्ये संघर्ष पेटताना दिसते. ‘पाणंदीचा’ मार्ग कधी कधी भावकीच्या वादात बंद केला जातो. पण, हे वाद क्षणिक असतात. भावकीची भांडण वर्षभरात मिटून परत नव्या दुसऱ्या भांडणासाठी भावकीतल्या भांडणाचे भीडू बदलत राहतात. पण, परत भावकी एकत्र येऊन एकजुटीने उत्सव साजरे करत राहता.‘पाणंद’ जागच्या जागी उभी असते. सामाजिक ऐक्यासाठी ‘पाणंद’ आतुरतेने वाट पाहत असते. लग्नसमारंभात याच पाणंदीला आंब्याच्या पानांचे तोरण बांधून पाणंद सजवली जाते. पाणंदीला हे आंब्याच्या पानांचे तोरण बांधणाऱ्यांना नववर बिदागी देण्याची प्रथा आहे. त्यामुळे पाणंदीला तोरण बांधण्यासाठी वाडीतील तरुणाईचा चपळाई चालते. नववराकडुन हजार दीड हजारची बिदागी मिळवली जाते. नववधू-वर त्या पाणंदीच्या कमानीतून प्रवेश करतात.

पाणंदीच्या दुतर्फा आजीबाईच्या वन औषधी रोपांची लागवड केली जाते. ‘पाणंद कोकणातील पायवाट’

कोकण निसर्गाची कविता जिथे दररोज लिहिली जाते. डोंगर-दऱ्या, हिरवीगार माळराने सजलेली गावं, आणि त्यातून जाणाऱ्या त्या छोट्या पायवाटा… म्हणजेच ‘‘पाणंद’’! ही फक्त चालण्याची वाट नाही, ही एक जिवंत आठवण असते गावाच्या, माणसांच्या, आणि कोकणी संस्कृतीच्या आपलेपणाची.

पाणंद म्हणजे गावातून माळरान, शेत, डोंगर, वा नदीकाठी नेणारी छोटेखानी मातीची वाट. मोटार गाडीचं त्यावर काही काम नाही. ही वाट फक्त पायांचीच ओळखणारी असते. कोण कधी कुठे चालत गेलं, पाऊलखुणा कोणाच्या आहेत, हे गावकऱ्याला या पाणंदीवरून समजतं.

कोकणात पाणंदीला असणारे सामाजिक स्थान विलक्षण आहे.

पाणंद ही केवळ एक वाट नसून, ती गावाच्या जडणघडणीचा एक भाग आहे. बाया-बापड्यांची सकाळ या वाटेने सुरू होते. डोक्यावर हंडा घेऊन विहिरीकडे जाणाऱ्या स्त्रिया, गुरे घेऊन जाणारे गुराखी, शाळेकडे धावणारी लहान पोरं…



धनंजय शेटये

या पाणंदीवर जीवनाचे अनेक पैलू दिसून येतात.

‘पाणंद’ कोकणी निसर्गाचे विलोभनीय रुप असते. पानाफुलांनी बहरलेली पाणंद पाहणे म्हणजे स्वर्गसुख होय. पाणंदीच्या प्रवेशद्वारावर असणाऱ्या गुलमोहराची, काटेसावर, पिंपळ, वड, सातीवन यांसारख्या विशालकाय वृक्षांनी तर एक अनोखी नजाकत निर्माण झालेली असते.

‘पाणंद’ म्हणजे भावकीचा दुवा!

‘पाणंद’ म्हणजे निसर्गाचा रानमेवा,

पाणंद म्हणजे नितळ, स्वच्छ नैसर्गिक सौंदर्यच!

कित्येक आठवणींच्या साक्षीदार साक्षीदार असते.

या पाणंदींवरूनच प्रेमकथांचा आरंभ व्हायचा, तर कधी शेवटही. उत्सवाच्या वेळी, मिरवणुका याच वाटेने जायच्या. देवळातल्या होणाऱ्या यात्रेच्या दिवशी पाणंद उत्साहाने फुलायची. जणू तीही आनंदी व्हायची.

आजच्या बदलत्या काळात पाणंदी लुप्त होत आहेत.

आजकाल मात्र या पाणंदी हळूहळू हरवत चालल्या आहेत. सिमेंटच्या रस्त्यांनी त्या झाकल्या जात आहेत. गावातील मुले-मुली मोबाईलच्या दुनियेत अडकलेली, त्यांना या पाणंदीची नाती उमजेनाशी झाली आहेत.

पण आजही जेव्हा एखादा गावकरी शहरात असतो आणि मनात कोकण येतो, तेव्हा आठवणीत सर्वप्रथम पाणंदच येते. कारण ती वाट म्हणजे बालपणाची आठवण, मायाळू आजीच्या घराची दिशा, किंवा शाळेच्या वाटेवरचा पहिला पाऊस.

‘पाणंद’ म्हणजे कोकणाच्या हृदयाची धडधड आहे.

ती चालवणं म्हणजे केवळ अंतर पार करणं नसून, एक अनुभव, एक श्रद्धा आणि एक परंपरा जपणं आहे.

कोकणातील ‘पाणंद’ ही केवळ शेतमळ्यातून जाणारी पायवाट नाही, तर ती कोकणी माणसाच्या सामाजिक, भावनिक आणि सांस्कृतिक जीवनाचाही भाग आहे.

कोकणातल्या प्रत्येक गावात, वाडीत, शेतशिवारात तुम्हाला पाणंद दिसून येते. ही वाट माणसांची, गुरांची, आणि कधीकधी वादांची देखील असते!

कोकणात शेतांची रचना अशी असते की, एकमेकांशी लागून अनेक कुटुंबांची शेतं असतात. त्यांच्या मधून जाणाऱ्या पाणंदींचा उपयोग सर्वजण करत असतात. मात्र यामुळेच अनेकदा वाट बांधण्याचा हक्क, कुणी कुणाच्या शेतातून जातं, गुरं कुठून नेली जातात, यावरून गावात वादही उद्भवतात.

‘माझ्या शेतातून पाणंद नको!’ असा हट्ट काहीजण धरतात.

‘पूर्वीपासून हिच वाट चालू आहे!’असे सांगत दुसरे लोक हक्क सांगतात.

या छोट्या वाटांमुळे कोर्टात खटले सुद्धा चालतात.

या वादांमुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. काही वेळा गावपंचायतीच्या बैठका, ग्रामसभा, किंवा वडीलधाऱ्या मंडळींच्या मध्यस्थीने ते वाद मिटवले जातात.

पण याच पाणंदींनी गावाला एकत्रही आणलं आहे. यात्रेच्या, सणावाराच्या दिवशी हीच पाणंद साऱ्यांना एकत्र आणते:

सकाळी लवकर सगळ्या शेतकऱ्यांच्या पावलांनी फुललेली वाट, एकमेकांना बोलावून साथ देत चालणाऱ्या बाया, एकाच पाणंदीने विहिरीवर जाणाऱ्या वाड्यातल्या स्त्रिया, हरवलेली गाय शोधायला मिळून निघालेले शेजारी या पाणंदीवरून नातेसंबंध फुलतात, गप्पा रंगतात, गावपण जपलं जातं.निसर्गाशी नातं जपणारी पायवाट असते. पावसाळ्यात ही पाणंद हिरव्यागार गवताने मढलेली, फुललेली असते. एखादा गावकरी गाडीत बसूनही म्हणतो,

ती नुसती शेतातली वाट नाही; ती नात्यांची, आठवणींची, आणि गावकुसाची एक दुवा आहे.पाणंद ही कोकणी माणसाची सामाजिक समजूतदारपणा, राग, रागाचे शमन, आणि प्रेम यांची साक्षीदार वाट आहे.

ती वाद घालते, पण त्याहून जास्त ती माणसं जोडते. **

## वाचनीय आणि प्रेरक

# कन्या झाली हो …

‘‘कन्या झाली हो..’’ ही अविनाश कोल्हे यांची कादंबरी संधिकाल प्रकाशनने नुकतीच प्रकाशित केली आहे. ही कादंबरी लेखकाने ‘एकेकाळी ‘‘अफाट खपाचं डार्लिंग विकली’’ असलेल्या ‘‘साप्ताहिक मनोहर’’ला कृतज्ञतापूर्वक…’ अर्पण केली आहे. १९७३साली लेखक पुण्याला फर्ग्युसन महाविद्यालयात शिकण्यासाठी, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथून दाखल झाले. ‘‘ज्याची पहिली पिढी कॉलेजात दाखल होत आहे अशा माझ्यासारख्या ब्राह्मणेतर मुलाच्या मनात ‘साप्ताहिक मनोहर’ च्या वाचनामुळे पुण्यात जगताना कधीही न्यूनगंड निर्माण झाला नाही.’’ असे लेखकाने नमूद केले आहे. सुरुवातीच्या काळात लेखकाला जवळचे मित्र नव्हते.

‘साप्ताहिक मनोहर’ हाच लेखकाचा जिवाभावाचा मित्र झाला. या पुस्तकाचे रंगीत मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांचे आहे.




सुनीता परब ही मुंबईतल्या महापालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करते. संध्याकाळच्या वेळात ती ‘नारी विमोचन मंच’ या स्वयंसेवी संस्थेत कामाला जाते. दिवसभरची शाळा आणि संध्याकाळी काही काळ संस्थेतील कार्य, हे संपवून घरी जायला तिला उशीर होत असे. घरी तिचा नवरा संतोष आणि त्यांची छोटी मुलगी, पिंकी तिची वाट पाहत असत. गृहिणी म्हणून तिला घरातील सर्व कामे करावी लागत. लग्नानंतर अल्पावधीत तिला मुलगी झाली. एकाच अपत्याचा निर्णय घेतल्यामुळे मुलीला उत्तम प्रकारे वाढवणे हे तिचे उद्दिष्ट होते. परंपरागत नवऱ्यासारखाच संतोष वागत असल्याने, अधून मधून तो बायकोला, दारू पिऊन आल्यावर मारहाणही करत असे. आजूबाजूच्या घरांतून होते तसेच ते असल्यामुळे सुनीता त्याकडे काहीसे दुर्लक्ष करत असे, सहन करत असे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात असे लक्षात आले की, स्त्रियांवर भारताप्रमाणेच, जगभर सर्वच देशांत अन्याय होतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ - १९८५ हे ‘आंतरराष्ट्रीय महिला दशक’ म्हणून जाहीर केले. यामुळे स्त्री मुक्तीला जागतिक आयाम प्राप्त झाला. त्याचे जगभर परिणाम झाले, तसेच पडसादही उमटले. त्यानिमित्ताने महाराष्ट्र सरकारच्या महिला विकास विभागाचे काही अधिकारी आणि संयुक्त राष्ट्र संघाचे काही अधिकारी मुंबईतील ‘नारी विमोचन मंच’ सारख्या महिला विकासाचे कार्य करत असलेल्या संस्थांना भेटी देत होते. त्यांना जर एखाद्या संस्थेचे कार्य योग्य वाटले तर त्या संस्थेला संयुक्त राष्ट्रसंघातर्फे आर्थिक मदत मिळणार होती. परिणामी विविध स्वयंसेवी संस्था ही मदत मिळविण्यासाठी प्रयत्नशील होत्या. ‘नारी विमोचन मंच’ संस्थेच्या प्रमुख दातार बाईंनी या संधीचा फायदा घेण्याचे ठरविले. समाजप्रबोधन करण्यासाठी काय करता येईल, या दृष्टीने त्यांच्या कार्यालयात चर्चा होत असे. एकदा सुनीता शाळेतून नारी विमोचन मंचाच्या कार्यालयाकडे जात असताना, गल्लीच्या तोंडाजवळ मदारी-जमुरा हा खेळ सुरू होता. हा खेळ थोडा वेळ पाहिल्यावर सुनीताच्या मनात आले की, मदारी-जमुरा हा अविष्काराचा फॉर्म घेऊन आपल्याला एखादे नाटक किंवा पथनाट्य लिहिता येईल. त्याद्वारे स्त्रियांच्या प्रश्नांवर प्रकाश

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

टाकता येईल आणि स्त्री मुक्तीचा संदेश देता येईल. या कल्पनेच्या प्रेरणेने सुनीता रजा घेऊन ग्रंथालयात जाते आणि झपाट्याने लेखन करते. मुंबईसारख्या महानगरात आणि अन्यत्र नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांची होणारी आबाळ टाळण्यासाठी सरकारने ‘पाळणाघर’ सुविधा निर्माण केल्यास अनेक नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे ताणतणाव कमी होण्यास मदत होईल. हाच संदेश सुनीताने आपल्या पथनाट्यातून दिला होता. ते वाचल्यावर आणि ते सर्वांना पसंत पडल्यावर चाणाक्ष दातार बाईंनी हे पथनाट्य बसून घेतले. त्यानंतर सादर झालेला प्रयोग सर्वांना आवडला आणि हा प्रयोग सर्वत्र व्हावा अशी शिफारस महापालिकेतील उच्चपदस्थ रेगे बाईंनी केली.
रेगे बाईंना या पथनाट्याचे महत्त्व समजते. त्यांच्या मदतीने त्या पथनाट्याचे पुस्तक अल्पावधीतच गृहमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशित होते. सुनीता एकदम प्रकाश झोतात येते. विविध स्त्रियांच्या संस्थांमध्ये सुनीताला स्त्रियांच्या समस्यांवरील व्याख्याने देण्याची संधी मिळते. ग्रंथालयात जाऊन, स्त्रियांच्या प्रश्नांवर उत्तरे शोधण्याचे कार्य करणाऱ्या, विविध स्त्रियांच्या कार्यांचा सुनीता शोध घेते. तिच्या व्याख्यानांमध्ये सुधारणा होत जाते. दातारबाईंबरोबर सुनीताला एका आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेण्यासाठी अमेरिकेला जाण्याची संधी प्राप्त होते. नंतर रेगे बाईंच्या मार्गदर्शनामुळे आणि पाठिंब्यामुळे सुनीताला महापालिकेच्या स्पेशल प्रोजेक्टची ओ.एस.डी. म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तेथे काम करताना, तिला महापालिका क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांच्या प्रत्यक्ष कार्याची कल्पना येते. मात्र रेगे बाईंची बदली झाल्यानंतर ती या जबाबदारीतून मोकळी होते. तिच्या घरामध्ये, तिची होणारी प्रगती संतोषला आवडत नाही. यातूनच त्याची असह्य होणारी मारहाण सहन न झाल्याने शेवटी सुनीता पोलीस स्टेशनला त्याच्याविरुद्ध तक्रार करते. त्यामुळे संतोष दुबईला नोकरीसाठी आणि भरपूर पैसा मिळवण्यासाठी जातो. तेथून पिंकीला पत्रे पाठवून तो, अबोला धरलेल्या सुनीताच्या विरुद्ध पिंकीला तयार करण्याचा प्रयत्न करतो. पिंकीला दुबईला शिकायला नेण्याचे आश्वासन देतो. परंतु या पोकळ आश्वासनामुळे पिंकी दुखावली जाते आणि आईच्या मदतीने माथेरानच्या इंग्रजी माध्यमच्या शाळेत प्रवेश घेते. दातारबाई पीएच. डी. करण्यासाठी अमेरिकेला जातात. तेव्हा त्या आपले पद सुनीताकडे सोपवितात. अनुभवी पंडितांची तिला मदत होते. परिणामी सुनीता जरी एकटी पडली, तरी तिला स्व प्रगतीचा मार्ग सापडतो आणि त्यादृष्टीने प्रयत्न करण्यास ती सज्ज होते.

या कादंबरीद्वारे लेखक आपल्याला ऐंशीच्या दशकात घेऊन जातात. कनिष्ठ मध्यमवर्गीय, नोकरी करणाऱ्या, मुंबई महानगरात राहणाऱ्या स्त्रियांच्या विविध समस्या आणि त्या भवतालचे वातावरण निर्माण करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. या कादंबरीतील विविध पात्रे वाचकाच्या मनात दीर्घकाळ घर करून राहतील अशी आहेत. पुस्तकातील काही मुद्रण दोष खटकतात. ‘नारी विमोचन मंच’ या संस्थेचा उल्लेख, पृष्ठ ४४वर ’ नारी समता मंच’ असा सदोष झाला आहे. अविनाश कोल्हे यांची ही कादंबरी नितांत वाचनीय, प्रेरक आणि स्त्री-पुरुष सर्वांचे प्रबोधन करणारी झाली आहे. **

पुस्तकाचे नाव : कन्या झाली हो
लेखक : अविनाश कोल्हे, ९८९२१०३८८०
प्रकाशक : संधिकाल प्रकाशन, नवघर, भाईंदर (पू) - ४०११०५
प्रथमावृत्ती : मार्च २०२५
पृष्ठे : २८० मूल्य : रु.३२५/-

# विचारश्रीमंतीने नटलेले कथाविश्व : दौलत

डी.बी. जगत्पुरिया हे मराठी साहित्यातील मातब्बर नाव आहे. पत्रकार, नाटककार, वक्ता, स्तंभलेखक, समीक्षक, कवी म्हणून त्यांच्या खात्यावर बरीच ग्रंथसंपत्ती जमा आहे. आता कथाकार म्हणून कथेची ‘ दौलत’ त्यांच्या वाङ्मयीन खात्यावर जमा झाली आहे. जगत्पुरिया यांच्या ‘दौलत’ या कथासंग्रहात एकूण पंचवीस कथा आहेत. या सर्व कथा आकाराने लघु आहेत. परंतु आशयाच्या दृष्टीने फार मोठ्या आहेत. या व्यक्तिचित्रणपर कथांमधील काही व्यक्तिचित्रे अत्यंत लक्षवेधक,बाणेदार, प्रभावी व प्रेरक स्वरुपाची आहेत. ही व्यक्तिचित्रे प्रतिकुलतेविरुद्ध लढणारी आणि अनुकुल भविष्य घडविणारी आहेत. जीवनसंघर्ष हे या कथाविश्वाचे मुख्य आशयसूत्र आहे. या कथांमधील नायक- नायिका संकटांपुढे वाकत नाहीत. झुकत नाहीत. तर, ते संकटांना वाकविण्यासाठी अविरत झुंज देत आहेत. मुळात डी.बी. जगत्पुरिया हीच एक वादळी व झुंजार प्रतिभा आहे. या झंझावाती प्रतिभेमुळेच ‘ दौलत’ मधील कथांना झुंजीचे परिमाण प्राप्त झाले आहे. या कथांच्या व कथाकाराच्या गौरवार्थ थोर साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांनी ‘डी. बी. जगत्पुरिया या नावाचा अर्थही अंतहीन झुंज हाच आहे … जगत्पुरिया यांनी अजिंक्य झुंजीनेच या झुंजीच्या गौरवगोष्टी लिहिल्या आहेत ’ असा अतिशय समर्पक अभिप्राय नोंदविला आहे. या कथांमधील झुंजीचे चित्रण खरचं आशादायक, दिशादर्शक व प्रेरक आहे ! या कथा झुंजण्यास बळ देणाऱ्या आहेत.

जीवनानुभवातून कलावंताची जीवनदृष्टी आकार घेते. आणि या जीवनदृष्टी नुसार त्याचे कलाविश्व साकार होते. कला ही अनुभवांचे आणि सभोवतीच्या जीवनजाणीवांचेच आविष्करण असते. तसेच कलेतून कलावंताच्या मनातील विचारसूत्र आणि कार्यक्षेत्रही डोकावत असते. याचा प्रत्यय आपल्याला ‘दौलत’ मधील कथा वाचताना येतो. या कथांची नाळ ग्रामीण जनजीवनाशी जुळली असून या कथांचा बाज लोककथांशी नातं सांगणारा आहे. या कथांमधील बहुतेक नायक-नायिका व पात्रे ही रोजमजुरी करणारी,शेतीमातीत राबणारी आणि ध्येयाने झपाटलेली आहेत. कथांमधून भेटणाऱ्या सर्व व्यक्तिरेखा स्वाभिमानी, बाणेदार व झुंजार आहेत. ‘आखाडा’ या पहिल्याच कथेत मस्तवाल रायभान पाटलावर चाल करून जाणारी आणि ‘‘वाघीन म्हेत्यात मला. तुजे दात न्हाई पाडले तर बापाचं नाव सांगणार न्हाय!’’ (पृष्ठ २१)अशी डरकाळी फोडणारी काशी कायम लक्षात राहते. ‘भैय्यासाहेब’ ही भावनेने ओथंबलेली व मनाला भिडणारी भावस्पर्शी कथा आहे. जगत्पुरिया यांनी या कथेतून वडिलांच्या परोपकारी वृत्तीचे व निस्वार्थी राष्ट्रभक्तीचे अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे. स्वातंत्र्यसेनानी म्हणून अनेक लबाडांनी मानधन पदरात पाडून घेतले. परंतु भैय्यासाहेबांनी हैद्राबाद मुक्तिलढ्यात लढूनही ‘‘आम्ही मानधन घेण्यासाठी काही केलं नाही. जे केलं ते देशासाठी केलं.’’ (पृष्ठ ३३) अशा निखळ राष्ट्रप्रेमी भावनेतून मानधन नाकारले. असले कर्मयोगी व्यक्तिमत्त्व खरचं दुर्मिळ आहेत! या कथेत त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगांमधून वडिलांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू उलगडून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे.

‘श्रमयोगिनी नबा’, ‘काळोख’, ‘शबनम’, ‘उड्डाण’, ‘गिरजा’, ‘ऐनूर आप्पा’, ‘निर्धार’ या नायिकाप्रधान कथा आहेत. या कथांमधून जगत्पुरिया यांनी स्त्रीमनाचे हळवे, समजूतदार, बाणेदार, कष्टाळू, करारी, स्वाभिमानी व विचारी असे अनेक पदर उलगडून दाखविले आहेत. ‘कर्मयोगिनी नबा’ या कथेतील मेळकरीण सुबा तोंडाने फार फटकळ आहे. फटकळ बोलण्याने तिच्या मेळ्यातील अनेक मजूर महिला दुखावल्या आहेत. परंतु पोटासाठी त्या अपमान गिळून मजुरी करतात. स्वाभिमानी नबा मात्र तात्काळ सुबाचा मेळ सोडून इतर मजूर




डॉ. मनोहर नाईक

महिलांना स्वाभिमानाचा मार्ग दाखवते. या सर्व मजूर स्त्रिया स्वाभिमानी व समजूतदार नबाच्या नेतृत्वात काम करू लागतात. मजुरी करणारी नबा या मजुरांची मेळकरीण होते. परंतु, मजूर स्त्रियांशी ती मालक बनून नव्हे तर, पालक होऊन वागते. त्यांचे सुख-दुःख समजून घेते. त्यांच्या अडचणी सोडवते. त्यामुळेच नबा ‘श्रमयोगिनी’ ठरते! ‘काळोख’ कथेतील सारजा कष्टाने व जिद्दीने पोलीस अधिकारी बनते.आणि कुटुंबातील दारिद्र्याचा व गावातील बजाबा पाटलाच्या अन्याय, अत्याचाराचा ‘काळोख’ नष्ट करते. ‘शबनम’ या अनाथ मुलीला मिलिंद आणि यशोधरा हे दाम्पत्य मुलगी म्हणून वाढवतात. पुढे ती असामान्य प्रतिभेची अष्टपैलू नर्तकी होते. थकत्या काळात मिलिंद यांची मिळकत बंद होते. घर कसं चालवायचं या विवंचनेत ते असतात. तेव्हा शबनम त्यांना ‘‘बाबा, काळजी करू नका. तुम्ही मला नवा जन्म दिलाय. तुम्ही नसते, तर माझं जीवन कधीच संपलं असतं. आता मला स्वतंत्र नृत्याचे कार्यक्रम मिळताहेत. तुम्ही आराम करायचा अन् मी तुमची सेवा करायची.’’ (पृष्ठ ६०) असा धीर देते. कुटुंबाचा आधार होते. जाती, धर्म, पंथाच्या भिंती ढासळतात आणि माणुसकी देखण्या रुपात पुढे येते! प्रतिक्षाच्या परिश्रमाने व जिद्दीने ध्येयाच्या आकाशात घेतलेले ‘उड्डाण’ खरचं नवीन पिढ्यांकरिता प्रेरणादायी आहे. ‘झुंज’ कथेतील ‘शबनम’ची सर्व आघाड्यांवरील झुंज थक्क करणारी आहे! अपंगत्वावर मात करून ती नामांकीत डॉक्टर होते आणि जनसेवेसाठी स्वतःला या क्षेत्रात झोकून देते. कसाई वृत्तीने बरबटलेल्या वैद्यकीय क्षेत्रात ‘शबनम’चे डॉक्टर होणे फार आशादायी वाटते! विशेष म्हणजे, तिच्या यशाचे गुपित जाणून घेण्यासाठी पत्रकार तिची मुलाखत घेतात. आणि ‘तू कोणता धर्म मानते?’ असा प्रश्न विचारतात. तेव्हा ती ‘‘मानवता धर्म हा जगात एकमेव सर्वश्रेष्ठ धर्म आहे. संविधानाचे पालन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.’’ (पृष्ठ ८७) असे धर्मनिरपेक्ष व संविधाननिष्ठ उत्तर देते. हे उत्तर धर्मांध आणि संविधानद्रोही वृत्तीला दिलेली सणसणीत चपराक आहे. ‘गिरजा’ कथेतील गिरधर आणि गिरजा काबाडकष्ट करून, खडी फोडून राम्या-शाम्याला मोठे साहेब करतात. दोघांचेही लग्न करून त्यांचा सुखी संसार थाटून देतात. परंतु, लग्नानंतर हे दोन्ही भाऊ आई-वडिलाला वाऱ्यावर सोडतात. गिरधर या आघाताने फार दुःखी होतो. तेव्हा गिरजा ‘‘धनी, पैदास चांगली असावी. न्हाईतर वांझ राहिलेलं बरं’’ (पृष्ठ ८८) असा धीर देऊन गिरधरमध्ये जगण्याची नवी उमेद जागवते. थकत्या वयातही परिश्रमाच्या व पाककलेच्या जोरावर ‘हॉटेल गिरजा’ नावारुपास आणते. या कथेतून जगत्पुरिया यांनी स्त्रीचे धीरोदात्त, कष्टाळू व खंबीर रूप अतिशय वेधक आणि उद्बोधक पद्धतीने रेखाटले आहे. ‘ऐनूर आपा’ हे या कथासंग्रहातील अतिशय मेहनती, प्रामाणिक व स्वाभिमानी व्यक्तिचित्र आहे. पती दौलतखाँ पठाणच्या निधनानंतर ऐनूर आपा नेकीने जीवन जगते. शेतकऱ्यांच्या शेतावर कष्ट करून एकुलत्या एका शब्बीरला वाढवते. शिकवते. सरळमार्गी शब्बीर पाटबंधारे खात्यात पाटकरी म्हणून नोकरीवर लागतो. मेहनती ऐनूर मजूर महिलांची मेळकरीण बनून शेतकऱ्यांच्या शेतांवर निंदण खुरपणीचे काम करते. भजन-पूजन करणाऱ्या, गंध-टिळा लावणाऱ्या नामदेवच्या शेतात ऐनूरसह इतर मजूर स्त्रीया काम करीत असतात. त्यातीलच विधवा असलेली हंसा शेतातील विहिरीवर कळशी भरायला येते. ती संधी साधून भक्तिमार्गी दिसणारा नामदेव तीची अब्रू लुटण्याचा प्रयत्न करतो. भयभीत हंसा ‘‘आपा इधर आओ. इज्जत बचाओ!’’ (पृष्ठ ९७) अशी आरोळी ठोकते. सर्व मजुर महिलांसह ऐनूर झोपडीकडे धावते. आणि ‘‘मुरदे, औरतपर बुरी नजर रखता है। तेरे घरमें माँ- भैन है क्या नही?’’ (पृष्ठ ९८) म्हणत त्याच्यावर चवताळते. सर्व महिला त्याला चांगला चोप देतात. अतिशय प्रामाणिक आणि संस्कारी महिला म्हणून ‘ऐनूर आपा’ डोंगरगावात प्रसिद्ध आहे. ऐनूरने मुलगा ब्बीरला ‘‘बेटा , नेकी से काम करना । नेकी में बडी बरकत होती है! मेरी दुवा तेरे साथ है।’’ (पृष्ठ ९७) अशा संस्कारात वाढवले आहे. मालदार खातं म्हणून ओळख असलेल्या पाटबंधारे खात्यातील भ्रष्ट अधिकारी घोटाळा करतात. निर्दोष शब्बीरला दोषी ठरवून नोकरीवरून काढून टाकतात. संस्कारी शब्बीर निरपराध आहे याची ऐनूरला पूर्ण खात्री आहे. म्हणूनच ती ‘‘मेरा बेटा नेक है। इमानदारी का चेक है’’ (पृष्ठ ९८) असे ठामपणे सांगते. सत्यान्वेषी पत्रकाराच्या लेखणीमुळे शब्बीरचे निर्दोषत्व सिद्ध होते. शब्बीर पुन्हा नोकरीत रुजू होतो. ही कथा अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण वाटते. महानगराच्या गल्लोगल्ली फिरून भाजी विकणाऱ्या ‘काळेमामा’ ची मुलगी माधुरी डॉक्टर बनण्याचा ‘निर्धार’ करते. आणि दुर्दम्य इच्छाशक्तीने व जिद्दीने ती आपला निर्धार पूर्ण करते. आई नबाच्या नावाने शहरात ‘नबाई हॉस्पिटल’ उभे करते. हॉस्पिटलच्या उद्घाटनप्रसंगी ‘‘माझं हॉस्पिटल गरिबांना, रंजल्या-गांजल्यांना समर्पित आहे.’’ (पृष्ठ १२९) असा मनोदय व्यक्त करते. ‘दौलत’मधील बहुतेक कथा या परिस्थितीविरुद्ध तर, कधी दुष्ट व्यक्तिंविरुद्ध लढणाऱ्या नायक, नायिकांच्या कथा आहेत. या कथांमधून डी.बी. जगत्पुरिया यांनी सर्वसामान्यांच्या जीवनातील संघर्षपट अतिशय प्रवाही व प्रभाविपणे शब्दबद्ध केला आहे.

डी.बी. जगत्पुरिया यांनी अध्यापन कार्यासोबत पत्रकारितेच्या क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. निर्भिड, प्रामाणिक व तत्त्वनिष्ठ पत्रकार म्हणून त्यांचे अनुभवविश्व रोचक व व्यापक आहे. या अनुभवविश्वाचे प्रतिबिंब ‘दौलत’ कथासंग्रहात अनेक ठिकाणी पडले आहे. ‘ऐनूर आपा’चा मुलगा शब्बीरवर अन्याय होतो. तेव्हा ‘जनशक्ती’ वृत्तपत्रात स्तंभलेखन करणारे निर्भय पत्रकार भैय्यासाहेब शब्बीरला न्याय मिळवून देतात. ‘झुंजार पत्रकार’ या कथेतील ‘जनसत्ता’ दैनिकाचे संपादक शेखर आणि त्यांची संपूर्ण टिम लघुसिंचन विभागातील करोडो रुपयांचा घोटाळा उघड करतात. घोटाळ्याविरुद्ध लेखमाला चालवून भ्रष्टाचारी भास्करला न्यायालयामार्फत जन्मठेपेपर्यंत पोहोचवतात. जगत्पुरिया यांनी ‘झडप’, ‘सुरुंग’, ‘ऐनूर आपा’, ‘ झुंजार पत्रकार’ इत्यादी कथांमधून निर्भिड,निष्पक्ष आणि लोकाभिमुख पत्रकारितेचे सामर्थ्य लक्षवेधक स्वरुपात व शैलीत रेखाटले आहे. दहा-पंधरा वर्षांपूर्वीची वृत्तपत्रे आणि पत्रकारिता शोषित, पीडितांचा आधार व दुष्टांचा कर्दनकाळ होती. आताची बहुतेक सर्व वर्तमानपत्रे धनदांडग्यांची व सत्तेतील लांडग्यांची बटिक झाली आहेत. आणि पत्रकारिता कुत्र्यांसारखी लाचार झाली आहे. अनेक पत्रकारांनी भारतातील लोकशाही संपविण्याची सुपारी घेतली आहे. वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर ‘दौलत’मधून भेटणारी पत्रकारिता आदर्शवत व कौतुकास्पद वाटणारी आहे. ‘झडप’ कथेतून पश्चिम बंगालमधील राजकारणाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु तो एकांगी व विपर्यस्त वाटणारा आहे. ‘सुरुंग’ ही कथा महाराष्ट्राच्या कोरोना काळातील सरकारवर ‘बेतलेली’ आहे. या काळात घडलेल्या अनेक घटनांचे खापर बुधोजी सरकारवर फोडण्यात आले आहे. या कथेत जगत्पुरिया यांनी जय चॅनल चालवणाऱ्या प्रणव बाबूला पत्रकारितेतील महानायक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रणव म्हणजे केंद्रातील धर्मांध सत्ताधाऱ्यांचा पाळीव पत्रकार बंगाली बाबू ‘अर्णव’च आहे. हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. अलीकडे जे बाजारू पत्रकार भारतीय लोकशाहीला ‘सुरुंग’ लावण्याचे काम करीत आहेत, त्यात ‘अर्णव’चा आगाऊपणा आघाडीवर आहे. पत्रकारितेतील खलनायक जगत्पुरियांच्या कथेचा ‘महानायक’ कसा काय झाला? हे खरचं अनाकलनीय आहे!

‘दौलत’मधील सर्वच कथा या व्यक्तिचित्रणपर आहेत. यातील व्यक्ती सर्वसाधारणच आहेत. परंतु प्रत्येक व्यक्तीची धडपड ‘माणूस’ म्हणून जगण्यासाठी व पूर्णत्वाकडे जाण्यासाठी आहे. त्यामुळे सर्व व्यक्तिचित्रे उद्बोधक व वेधक झाली आहेत. अनेक कथांमधून कथाकारामध्ये दडलेला पत्रकार डोकावतो. त्याचप्रमाणे जगत्पुरिया यांच्यामधील उत्कट कवीदेखील अनेक कथांमधून व्यक्त होताना दिसतो! ‘दौलत’मधील कथा ही निवेदनमुखी आहे. कथाकाराची निवेदनशैली प्रभावी आहेच! परंतु ही कथा निवेदनाऐवजी संवादातून पुढे सरकली असती तर, ती अधिक प्रवाही व प्रभावी झाली असती.

डी.बी. जगत्पुरिया हे आंबेडकरी विचारविश्वातील महत्त्वपूर्ण नाव आहे. जुन्या पिढीतील प्रगल्भ व्यक्तिमत्त्व म्हणून या नावाभोवती एक वलय आहे. प्रखर जाणीवेचे कवी अशी त्यांची ख्याती आहे. त्यांच्या धारदार लेखणीतून उतरणारी कथा देखील त्याच तोडीची असावी. अशी अपेक्षा बाळगणे स्वाभाविक आहे. आंबेडकरी कथेला अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकरराव खरात, वामन होवाळ, केशव मेश्राम,अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम, उर्मिला पवार, अमिताभ, सुदाम सोनुले अशा अनेक कथाकारांनी कमाल उंचीवर नेले आहे. आंबेडकरी कथाकारांनी आपल्या कथांमधून भारतीय समाजजीवनात घडणाऱ्या समताद्रोही, अमानुष घटनांना वाचा फोडून साहित्याला चळवळीचे स्वरूप दिले आहे. या विचाराचे पाईक म्हणून डी.बी.जगत्पुरिया यांनी या पुढील कथालेखनातून हा वसा पुढे न्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो. **

# निवडक

## सात्विक-चिरागचे आव्हान संपुष्टात

**टोकियो :** जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारतीयांचे अपयश कायम राहिले. काल पी. व्ही. सिंधूचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले होते. आज लक्ष्य सेनसह सात्विक आणि चिराग शेट्टी यांना दुहेरीत गाशा गुंडाळावा लागला. जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेनच्या कामगिरीत सातत्य नसल्याचे आज पुन्हा सिद्ध झाले. जपानाच्या कोदाई नाराओकाविरुद्ध त्याचा



१९-२१, ११-२१ असा पराभव झाला. अवघ्या तासाभराच्या लढतीत त्याची हार झाली. लक्ष्य सेनने सलामीच्या लढतीत चीनच्या वँग झेंग झिंगवर २१-११, २१-१८ असा सहज पराभव केला होता, परंतु हेच सातत्य तो दुसऱ्या फेरीत कायम ठेऊ शकला नाही.पुरुष दुहेरीत सात्विक आणि चिराग शेट्टी यांच्याकडूनही निराशा झाली. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेल्या या जोडीचा चीनच्या पाचव्या मानांकित लियाँग वेई केंग आणि वँग चेंग यांच्याकडून २२-२४, १४-२१ असा पराभव झाला.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

## राजमाता जिजाऊ, महात्मा गांधी संघ बाद फेरीत



**पुणे :** पुणे जिल्हा कबड्डी संघटनेच्या सहकार्याने कबड्डी महर्षी बुवा साळवी चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत पुरुष विभागात वाघजाई चिपळूण, प्रकाशतात्या बालवडकर, बाबुराव चांदेरे फाऊंडेशन, शाहू संघ, सडोली तर राजमाता जिजाऊ, महात्मा गांधी बाद फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष विभागात बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन संघाने उपनगरच्या स्वस्तिक संघावर ४९-३२ अशी मात करीत बाद फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला दोन्ही संघ २१-२१ अशा समान गुणावर होते. मध्यंतरानंतर चांदेरे सोशल फाऊंडेशन संघाच्या सयाजी सुकासेने जबरदस्त खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. वाघजाई क्रीडा मंडळ, चिपळूण संघाने बालवडकर फाऊंडेशन संघावर ४४-३२ असा विजय मिळविला. महिला विभागात राजमाता जिजाऊ संघाने महात्मा गांधी स्पोर्ट्स क्लब संघावर ३८-१३ अशी एकतर्फी मात करीत सहज विजय मिळविला. मध्यंतराला राजमाता जिजाऊ संघाकडे २१-७ अशी भक्कम होती. राजमाता जिजाऊ संघाच्या निकिता पडवळ व साक्षी गावडे यांनी जबरदस्त खेळ करीत आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला. कोमल आवळे व रेखा सावंत यांनी पकडी घेतल्या. महात्मा गांधी स्पोर्ट्स क्लब संघाच्या पूजा चिंदरकर हिने एकाकी झुंज दिली व स्नेहल चिंदरकर हिने पकडी घेतल्या, धर्मवीर कबड्डी संघाने बारामती स्पोर्टस संघावर ३४-२८ अशी मात केली.

## हर्डीकरची शौनकवर सहज मात

**मुंबई :** बिगर मानांकित मंदार हर्डीकरने दुसऱ्या मानांकित पुण्याच्या शौनक शिंदेंचा ४-० (११-६, ११-६, ११-९, १३-११) असा सहज पराभव केला आणि खार जिमखाना येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य रोख बक्षिसांच्या टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली. पुरुष एकेरीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत अव्वल मानांकित रेगन अल्बुकर्कने झुबिन तारापोरवालावर (ठाणे) ४-१ (११-९, ११-८, १३-१५, १२-१०, ११-४) असा विजय मिळवला. महिला एकेरीच्या पहिल्या उपांत्य फेरीमध्ये बिगर मानांकित खिया शाहने अव्वल मानांकित मुंबई शहरच्या श्वेता पार्टे नायक हिला ४-१ (४-११, ११-६, १३-११, ११-७, ११-५) असे हरवले. दुसऱ्या सामन्यात दुसऱ्या मानांकित संपदा भिवंडकरने (टीएसटीटीए) तिची सहकारी श्रावणी लोके हिच्यावर (टीएसटीटीए) ४-० (१४-१२, १२-१०, ११-६, ११-७) असा सहज विजय मिळवला. १९ वर्षांखालील मुली एकेरीच्या अंतिम फेरीत मुंबई शहरची अर्पिता बोऱ्हाडे आणि ठाण्याची सुक्राती शर्मा आमने-सामने आहेत. अर्पिताने अव्वल मानांकित ठाण्याच्या अनुष्का पाटीलला ३-० (११-४, १२-१०, ११-५) असे हरवले. सुक्रातीने दुसऱ्या मानांकित श्रावणी लोके हिच्यावर ३-१ अशी मात केली.

## आशिया कपवर संकटाचे ढग

**नवी दिल्ली :** आशियाई क्रिकेट परिषदेची आशिया कपवर चर्चा करण्यासाठी २४ जुलै रोजी बांगलादेशातील ढाका येथे बैठक होणार आहे, परंतु आता ही बैठक अडचणीत आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळसह इतर अनेक सदस्य मंडळांनी राजकीय आणि राजनैतिक चिंतांमुळे बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे अध्यक्ष मोहसिन यांना अधिकृतपणे कळवले आहे की जर ही बैठक ढाका येथे झाली तर ते त्यात सहभागी होणार नाहीत.




भारत आणि बांगलादेशमधील सध्याच्या तणावपूर्ण राजकीय संबंधांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या विरोधाला न जुमानता, मोहसिन ढाका येथे बैठक घेण्यावर ठाम आहेत. एएनआयच्या सूत्रांच्या माहितीनुसार, आशिया कप तेव्हाच होऊ शकतो जेव्हा बैठकीचे ठिकाण ढाकाहून बदलले जाईल. मोहसिन बैठकीसाठी भारतावर अनावश्यक दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही त्यांना ठिकाण बदलण्याची विनंती केली होती परंतु त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. जर मोहसिन ढाकामध्ये बैठक घेत असतील तर बीसीसीआय कोणत्याही प्रस्तावावर बहिष्कार टाकेल. एसीसीने स्थळातील कोणत्याही बदलाबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही, ज्यामुळे आशिया कपचे भविष्य अनिश्चित झाले आहे.

# २०२६ चा फुटबॉल वर्ल्डकप धोक्यात

## ●तापमान वाढीचा खेळाडूंवर होणार परिणाम ● स्पर्धा हिवाळ्यात खेळवणे हाच उपाय




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पुढील वर्षी म्हणजे २०२६ ला होणाऱ्या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेला वाढत्या जागतिक तापमानाचा फटका बसणार असल्याचे समोर आहे. या स्पर्धेचे आयोजन अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा येथे संयुक्तरित्या करण्यात येणार असून संपूर्ण स्पर्धा कालावधीत प्रचंड उष्णतेचा तडाखा बसणार असल्याचे शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. त्यांच्या मते, उत्तर गोलार्धातील तळपत्या उन्हाळ्यात अशा भव्य स्पर्धांचे आयोजन करणे म्हणजे धोक्यालाच आमंत्रण देण्यासारखे आहे. अमेरिकेत नुकतीच फिफा क्लब विश्वचषक स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेदरम्यान तापमान वाढीची धोक्याची घंटा वाजवली आहे. ही केवळ एक झलक होती; खरी अग्निपरीक्षा तर २०२६ च्या विश्वचषकात पाहायला मिळणार आहे, असे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या, १९३० पासून विश्वचषक स्पर्धा जून आणि जुलै महिन्यात आयोजित केली जाते. तथापि, जागतिक स्तरावर या महिन्यांतील तापमानात १.०५ डिग्री सेल्सिअस (१.८९ डिग्री फॅरेनहाइट) ने वाढ झाली आहे, तर युरोपातील उन्हाळ्यात, विशेषतः १९९० च्या दशकापासून, १.८१ डिग्री सेल्सिअसची अधिक तीव्र वाढ दिसून आली आहे. प्रोफेसर पिअर्स फोर्स्टर यांनी गंभीर धोक्याची सूचना दिली आहे. त्यांच्या मते, आता कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे. स्पर्धा हिवाळ्यात किंवा थंड प्रदेशात खेळवणे हाच एक उपाय आहे. अन्यथा, उष्णतेमुळे एखादी मोठी दुर्घटना घडण्याचा धोका अटळ आहे, असा इशारा दिला आहे. लंडनच्या इंपीरियल कॉलेजमधील हवामानशास्त्रज्ञ फ्रेडरिक ओटो यांनीही उष्माघात आणि तीव्र उष्णतेमुळे येणारा थकवा टाळण्यासाठी सामने सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा खेळवण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले आहे.

१४ जून ते १३ जुलै दरम्यान ११ अमेरिकन शहरांमध्ये झालेल्या क्लब विश्वचषक स्पर्धेत अतिउष्णता आणि वादळी पावसाचा अनुभव आला. या स्पर्धे दरम्यान, फिफाने अतिरिक्त वॉटर ब्रेक, मैदानावर अधिक पाण्याची सोय आणि कुलिंग बेंच यांसारखे उपाय योजले असले तरी, चेल्सीचा खेळाडू एन्झो फर्नांडिझ याने भोवळ येत असल्याची तक्रार केली. तसेच आगामी विश्वचषक स्पर्धेसाठी दुपारच्या वेळेतील सामने टाळण्याचे आवाहन फिफाला केले.

जागतिक फुटबॉलपटूंच्या संघटनेने, पुढील वर्षीच्या विश्वचषकातील १६ पैकी सहा शहरांना उष्णतेच्या ताणाचा अत्यंत उच्च धोका असल्याचे म्हटले आहे. यावर फिफा अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी दिवसा होणाऱ्या सामन्यांसाठी बंदिस्त स्टेडियमचा वापर केला जाईल, असे म्हटले आहे. स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्को यांच्या यजमानपदाखाली होणाऱ्या २०३० च्या विश्वचषकात उष्णतेचे आव्हान अधिकच मोठे आहे. हे सामने जूनच्या मध्यापासून जुलैच्या मध्यापर्यंत अशा देशांमध्ये होणार आहेत, जिथे या उन्हाळ्यातच तापमान ४० डिग्री सेल्सिअस (१०० डिग्री फॅरेनहाइट)च्या पुढे गेले आहे. तरीही, फिफाने या धोक्याला गांभीर्याने घेतलेले नाही. २०३० च्या यजमानपदासाठी मूल्यांकन करताना त्यांनी उष्णतेचा धोका कमी लेखला. फिफाने स्पष्ट म्हटले आहे की, यामुळे खेळाडू किंवा इतर सहभागींच्या आरोग्यावर कोणताही परिणाम होणार नाही. कॅनबेरा विद्यापीठाचे ज्युलियन पेरियार्ड यांनी यातील गंभीर धोक्यांवर बोट ठेवले आहे. त्यांच्या मते, दिवसाच्या सर्वात उष्ण वेळी थेट सूर्यप्रकाशात ९० मिनिटे फुटबॉल खेळणे अत्यंत घातक ठरू शकते. यामुळे खेळाडूंना अनेक गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते. यामध्ये हायपरथर्मिया (अतिउष्णता), हृदयावर अतिरिक्त ताण आणि स्नायूंमध्ये पेटके येणे यांसारख्या समस्यांचा समावेश आहे. हा त्रास इतका वाढू शकतो की, खेळाडूला तीव्र थकवा जाणवतो आणि प्रसंगी जीवघेणा उष्माघातही होऊ शकतो. ऑलिम्पिक मॅरेथॉनसारख्या अनेक उन्हाळी क्रीडा स्पर्धांमध्ये तीव्र उष्णता टाळण्यासाठी सामन्यांची वेळ बदलली जाते, परंतु फुटबॉलमध्ये सकाळच्या वेळेत सामने होणे दुर्मिळ आहे. यामागे अनेकदा युरोपातील दूरचित्रवाणी प्रेक्षकांचा विचार असतो. ४८ संघांच्या विस्तारित २०२६ विश्वचषकामुळे व्यस्त वेळापत्रकामुळे फिफाला दिवसाचे सामने टाळणे कठीण होणार आहे.

उत्तर गोलार्धातील उन्हाळ्यात विश्वचषक आयोजित केल्यास उष्णतेची समस्या निर्माण होते. याच कारणामुळे कतारमधील २०२२ चा विश्वचषक नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये खेळवण्यात आला. सौदी अरेबियातील २०३४ च्या विश्वचषकासाठीही असाच बदल अपेक्षित आहे. मात्र,विश्वचषकाच्या वेळापत्रकात बदल करणे गुंतागुंतीचे आहे. यामुळे युरोपियन फुटबॉल लीगच्या वेळापत्रकावर परिणाम होतो. यात देशांतर्गत आणि चॅम्पियन्स लीग स्पर्धांचा समावेश आहे. फिफाने २०३० आणि २०३४ विश्वचषकाच्या तारखा बदलण्याबाबत अद्याप कोणतेही भाष्य केलेले नाही.वाढत्या जागतिक तापमानामुळे, मोठ्या मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन केव्हा आणि कुठे करावे, हा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनणार आहे.

> **सिडनी विद्यापीठाचे प्राध्यापक ओली जे यांच्या मते, १९९० च्या दशकाच्या तुलनेत २०२३ मध्ये खेळाडू आणि सामान्य नागरिकांनाही २८ टक्के अधिक मध्यम किंवा उच्च उष्णतेच्या धोक्याचा सामना करावा लागला. हवामान बदलामुळे आपल्या जीवनशैलीवर गंभीर परिणाम होत आहेत. हे बदल आपल्या नेहमीच्या जगण्यात मोठे अडथळे निर्माण करत आहेत. – मायकल मान**
> **पेनसिल्व्हेनिया विद्यापीठाचे हवामान शास्त्रज्ञ**

# ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश

**। लॉस एंजेलिस । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिक २०२८ मध्ये क्रिकेटच्या समावेशाबाबत एक मोठी आणि महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. या स्पर्धे तील क्रिकेट सामन्यांचे वेळापत्रक आणि ठिकाण आता निश्चित झाले असून, क्रिकेटप्रेमींची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. क्रिकेट या खेळासाठी ही एक ऐतिहासिक घटना आहे, कारण तब्बल १२८ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर क्रिकेट ऑलिम्पिकमध्ये पुनरागमन करत आहे. अखेरचे क्रिकेट सामने १९०० साली पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेळवण्यात आले होते. त्यावेळी केवळ ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स या दोनच संघांनी सहभाग घेतला होता. त्या ऐतिहासिक सामन्यात ग्रेट ब्रिटनने विजय मिळवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले होते. तेव्हापासून क्रिकेट ऑलिम्पिकच्या पटलावरून दूर होते. आता लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेमुळे क्रिकेटला पुन्हा एकदा जागतिक स्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे.

ऑलिम्पिक २०२८ मधील क्रिकेटचे सामने लॉस एंजेलिसपासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या पोमोना शहरातील फ़ेअरग्राउंड्स स्टेडियममध्ये आयोजित केले जातील. या स्पर्धेला १२ जुलै २०२८ रोजी सुरुवात होईल, तर सुवर्णपदकासाठीचे अंतिम सामने २० आणि २९ जुलै रोजी खेळवले जातील. एकूण १६ दिवस क्रिकेटचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

आता पुरुष आणि महिला गटात कोणते संघ सुवर्णपदक जिंकण्यात यशस्वी ठरतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. अर्थात, त्यासाठी क्रीडाप्रेमींना अजून तीन वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. भारतीय पुरुष आणि महिला संघ पदकाचे प्रबळ दावेदार म्हणून या स्पर्धेत सहभागी होतील, अशी दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. २१व्या शतकात पहिल्यांदाच घडला असा विक्रम.भारतातील क्रिकेटची अफाट लोकप्रियता हे क्रिकेटला ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळण्यामागील एक प्रमुख कारण मानले जाते. क्रिकेटच्या समावेशामुळे ऑलिम्पिकमधील खेळांची विविधता आणि रोमांच अधिक वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मेस्सीची विक्रमी मालिका खंडित

**। सिनसिनाटी । वृत्तसंस्था ।**

इंटर मियामी एफसीला सिनसिनाटीकडून ०-३ असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे मेजर लीग सॉकर स्पर्धेत सलग पाच सामन्यांत एकापेक्षा अधिक गोल करण्याची लिओनेल मेस्सीची विक्रमी मालिका संपुष्टात आली. सिनसिनाटीविरुद्ध या सामन्यात मेस्सीला एकही गोल करता आला नाही. पहिल्या सत्रात गेरार्डो व्हॅलेन्झुएलाच्या गोलमुळे सिनसिनाटीने आघाडी घेतली, तर दुसऱ्या सत्रात एव्हांडरच्या दोन गोलांमुळे त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयामुळे सिनसिनाटीने ईस्टर्न कॉन्फरन्समध्ये फिलाडेल्फिया युनियनच्या केवळ एका गुणाने मागे राहत आपले दुसरे स्थान कायम राखले. दुसरीकडे, फिलाडेल्फियाने सीएफ मॉन्ट्रियलला २-१ ने पराभूत केले. या पराभवामुळे इंटर मियामीची सलग पाच सामन्यांची विजयी मालिका खंडित झाली असून, सध्या संघ पाचव्या क्रमांकावर आहे. अमेरिकेतील या मेजर लीग सॉकर स्पर्धेत सलग पाचपेक्षा अधिक सामन्यांत एकापेक्षा अधिक गोल करण्याचा विक्रम मेस्सीने केला आहे. त्याने १७ सामन्यांतून १६ गोल केले असून, तो लीगमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंमध्ये अग्रस्थानी आहे; मात्र, सिनसिनाटीविरुद्ध या सामन्यात तो प्रभाव टाकू शकला नाही. मेस्सीने आतापर्यंत सिनसिनाटीविरुद्ध फक्त तीनवेळा खेळले आहे. तरीही आठ वेळा 'सर्वोत्तम फुटबॉलपटू'चा सन्मान मिळवलेल्या या दिग्गजांसमोर सिनसिनाटीच्या खेळाडूंनी अडथळे निर्माण करीत त्याला रोखून धरले. या सामन्यात गोल करण्याचा मेस्सीचा पहिला प्रयत्न पहिल्या अर्धाच्या भरपाई वेळेत झाला होता; परंतु त्याचा फटका गोलरक्षक रोमन सेलेन्टानोने सहजपणे रोखला. त्यानंतर ७८ व्या मिनिटालाही मेस्सीला संधी मिळाली; मात्र त्याचा जवळचा फटका सेलेन्टानोने झडप घालून अडवला आणि मेस्सीची विक्रमी मालिका खंडीत केली.



## अर्जुनचा बुद्धिबळात नवा इतिहास

**लास वेगास :** भारताच्या २१ वर्षीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीने, जागतिक बुद्धिबळात नवा इतिहास रचला आहे. लास वेगास येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या फ्रीस्टाईल चेस ग्रँड स्लॅम टूरच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. रोमहर्षक उपांत्यपूर्व सामन्यात त्याने जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानी असलेल्या उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तारोवचा सहज पराभव करत अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले. अर्जुनचा आता उपांत्य फेरीत अनुभवी ग्रँडमास्टर लेवॉन अरोनियनविरुद्ध सामना होणार आहे. अर्जुनने या लढतीत आपला आक्रमक आणि कल्पक खेळ दाखवला. त्याने पहिला रॅपिड जिंकून निर्णायक आघाडी घेतली आणि दुसरा सामना बरोबरीत सोडवत विजय साकारला.

# बटलरचा ऐतिहासिक पराक्रम

**। लीडस् । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडचा यष्टिरक्षक आणि टी-२० संघाचा कर्णधार जोस बटलरने टी-२० क्रिकेटमध्ये आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठत १३,००० धावांचा मैलाचा दगड पार केला आहे. लँकशायरकडून खेळताना यॉर्कशायरविरुद्धच्या व्हिटॅलिटी ब्लास्ट सामन्यात त्याने ४६ चेंडूंमध्ये ७७ धावा ठोकत हा विक्रम केला. या कामगिरीनंतर बटलर टी-२० क्रिकेटमध्ये १३,००० हून अधिक धावा करणारा केवळ सातवा फलंदाज ठरला आहे. बटलरने आतापर्यंत ४५७ टी-२० सामन्यांमध्ये ४३१ डावांत १३,०४६ धावा केल्या असून त्याची सरासरी ३५.७४ आहे. यादरम्यान, त्याने ८ शतके व ९३ अर्धशतके झळकावली असून सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या १२४ आहे. आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये बटलर हा इंग्लंडसाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरतो. त्याच्या खात्यात १३७ सामन्यांत ३,७०० धावा आहेत. २०२२ च्या टी-२० विश्वचषकात त्याच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने विजेतेपद पटकावले होते. आयपीएलमध्येही बटलरने १२१ सामन्यांत ४,१२० धावा केल्या असून सरासरी ४०.०० आहे. त्याने सात शतके आणि २४ अर्धशतके ठोकले असून राजस्थान रॉयल्स, मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्याकडून खेळला आहे. टी-२० लीगमधील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे बटलर हा आजच्या घडीचा सर्वात प्रभावशाली फलंदाजांपैकी एक ठरला आहे.




खिस गेल : १४,५६२ धावा
किरोन पोलार्ड : १३,८५४ धावा
ॲलेक्स हेल्स : १३,८१४ धावा
शोएब मलिक : १३,५७१ धावा
विराट कोहली : १३,५४३ धावा
डेव्हिड वॉर्नर : १३,३९५ धावा केल्या आहेत.

## बर्मिंघम शहरामध्ये स्पर्धेचे आयोजन | सहा क्रीडा प्रकारात सहभाग घेऊन ६४ पदके मिळविली

# सीआयएसएफचा अमेरिकेत डंका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**कंपनी, देशाच्या सुरक्षा राखण्याचे काम करीत असताना क्रीडा क्षेत्रातही दमदार कामगिरी सीआयएसएफ तथा केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने केली आहे. अमेरिकेमध्ये झालेल्या क्रीडा स्पर्धेत सीआयएसएफ दलाने सहा खेळांमध्ये सहभाग घेऊन ६४ पदके मिळविली. भारतातील सीआयएसएफ दलाने तृतीय क्रमांक मिळवून क्रीडा स्पर्धेमध्ये अमेरित डंका वाजवला. त्याच्या या कामगिरीचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.**

देशासह, राज्य जिल्हा, तालुकास्तरावरील वेगवेगळया कंपन्याची सुरक्षा केंद्रीय औदयोगिक सुरक्षा दलामार्फत राखली जाते. सुरक्षा दलाचे जवान रात्रीचा दिवस करून कंपन्यांतील सुरक्षा जपण्याचे काम करतात. कंपनीमधील काही संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम सीआयएसएफ दलामार्फत केले जाते. एक सक्षम सुरक्षा दल म्हणून सीआयएसएफ दलाकडे पाहिले जाते.

वर्ल्ड पोलीस आणि फायर गेमचे आयोजन अमेरिकेच्या बर्मिंघम शहरामध्ये करण्यात आले होते. ३० जून ते ६ जूलै २०२५ या कालावधीत या ठिकाणी स्पर्धा झाल्या. जगभरातील विविध संस्थांमधून आलेल्या पोलीस, आणि अग्नीशमन सेवा कर्मचाऱ्यांनी वर्ल्ड पोलीस आणि फायर गेम्स २०२५ मध्ये विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. यावर्षी ७० हून अधिक देशांमधील दहा हजारहून अधिक खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल तथा सीआयएसएफ दलातील संघाने सहा स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात सीआयएसएफच्या खेळाडूंनी उत्त्कृष्ट कामगिरी बजावली. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे वर्ल्ड पोलीस आणि फायर गेम्समध्ये ६४ पदके मिळविण्यास सीआयएसएफच्या संघाला यश आले. त्यामुळे भारताला अंतिम क्रमवारीत तिसरे स्थान मिळवून देण्यात उल्लेखनीय योगदान लाभले आहे.

### आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा

**वर्ल्ड पोलीस आणि फायर गेम्स ही ऑलंपिक शैलीची स्पर्धा आहे. सुरक्षेबरोबरच जागतीक स्तरावरील सुरक्षा संस्थांसोबत संवाद राहवा. तसेच शरीर सदृढ आणि तंदरूस्त असावे, यासाठी ही स्पर्धा गेल्या अनेक वर्षापासून भरविली जात आहे. गतवर्षीदेखील या स्पर्धेत सीआयएसएफ संघाने सहभाग घेतला होता. यावर्षी देखील सहभाग घेऊन आपली कला सादर करून क्रीडा् स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. वैयक्तिक खेळ प्रकाराबरोबरच सांघिक खेळाचे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांचीदेखील प्रचंड गर्दी असते. त्यामुळे या स्पर्धेला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)